"आपले मंडळ"

|| Maharashtra Mandal of Detroit ||

# स्नेहबंध




## गणपती विशेषांक

सप्टेंबर २०१९

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

# With
# Best Compliments
# from

# Sachin
# and
# Anuja
# Lawande

# स्नेहबंध

## अनुक्रमणिका


| | | | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | संपादकीय | भारती मेहेंदळे | 5 |
| 2 | Committee Spotlight | भारती मेहेंदळे | 7 |
| 3 | पिंडे पिंडे प्रितीर्भिन्ने... | पूनम तोरगल | 10 |
| 4 | कधी घ्यावे, कधी द्यावे | सुरेश नायर | 14 |
| 5 | अशी ही लोकशाही | आशुतोष काळे | 14 |
| 6 | श्री गणेशास अनाहूत पत्र | बाळकृष्ण पाडळकर | 17 |
| 7 | कुठली वाट? | निरंजन हुंबड | 19 |
| 8 | Just असंच सहज | सुरेश नायर | 19 |
| 9 | आकाशवाणीच्या आठवणी | सिद्धार्थ शास्त्री | 20 |
| 10 | माझे जगणे | निरंजन हुंबड | 25 |
| 11 | प्रिय बाप्पा, | अनघा नाईक | 27 |
| 12 | नवी वाट - ओढ एव्हरेस्टच्या पायथ्याची | अंजू वळे | 28 |
| 13 | तू तू -मैं मैं | बाळकृष्ण पाडळकर | 32 |
| 14 | नव्या वाटा | अनघा नाईक | 32 |
| 15 | माझे राजकीय 'समर' | श्री ठाणेदार | 35 |
| 16 | (न) झिजणाऱ्या चपला | सुशांत खोपकर | 40 |





**संपादक**

ज्योत्स्ना दिवाडकर | संजय मेहेंदळे
ऋतूज देशपांडे | सुशांत खोपकर | उमा कानडे

**संपादक/सहाय्य**

मेधा उमरजी

**मुखपृष्ठ रचना व मांडणी**

मानसी डहाणूकर



लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना
संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

## Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LAKESHORE HEALTHCARE GROUP LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# स्नेहबंध



**नमस्कार मंडळी,**

**आपणा सर्वांना गणेश चतुर्थीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

श्रावण महिना लागला की आपल्याला आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाचे वेध लागतात. मन उत्साहानं भरून जातं. आरास काय करायची, नैवेद्याला काय करायचं, रांगोळी कोणती करायची एक ना अनेक...! आमच्या लहानपणी वाड्याचा, सोसायटीचा असा एक सार्वजनिक गणपती असायचा. मग त्यासाठी वर्गणी गोळा करण्यापासून ते डेकोरेशन, रांगोळ्या, विविध स्पर्धांचे आयोजन, विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम या सर्वांचे आयोजन आम्ही मुलं अगदी उत्साहाने करायचो.... माझ्या वाड्यातील अंगणात काढलेल्या रांगोळीपासून ते MMD आणि BMM ला काढलेल्या भल्या मोठ्या रांगोळ्यांपर्यंत.... सोसायटीच्या गणेशोत्सवाच्या आयोजनापासून ते आज MMD च्या अध्यक्षीय जबाबदारीपर्यंतचा प्रवास मागे वळून बघताना अचंबित करणारा वाटतो.

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली ते लोकांमध्ये एकोपा, एकजूट होऊन जनजागृती होण्यासाठी... आजही साता-समुद्रापार आल्यानंतर मराठी मनं एकत्र आणण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाने मोठीच किमया केली आहे. या निमित्ताने महाराष्ट्र मंडळाशी आमची नाळ जोडली गेली ती कायमचीच...! गेल्या २० वर्षांत मंडळ खूप मोठं झालंय. भारतातूनही बरेच कार्यक्रम येत असतात. मंडळ कितीही मोठं झालं तरी स्थानिक मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आपण गणपतीला मुलांचे कार्यक्रम आवर्जून करतो. त्याप्रमाणे यंदाही आपले सर्व बाल-कलाकार घेऊन येत आहेत एक रंगारंग कार्यक्रम "सुखकर्ता"!! आणि याचे सूत्रसंचालन करताहेत आपली युथ कमिटी! याशिवाय आपले ढोल-ताशा-लेझीम पथक बाप्पाच्या वाजत-गाजत येणाऱ्या मिरवणुकीसाठी सज्ज आहे. तरी आपण सर्व त्यांच्या कलेला मनापासून दाद द्याल यात शंका नाही.

"सुखकर्ता" कार्यक्रमासाठी आमचे सर्व कार्यकर्ते कसून काम करताहेत. डेकोरेशन टीम अगदी हटके आरास होईल यासाठी धडपडत आहे. फूड टीम तुमच्या आवडत्या पुरणपोळीच्या मेनूसह स्वादिष्ट भोजनाची सोय करत आहे. स्वागत टीम आपल्या स्वागतास उत्सुक असेलच. आपल्या लाडक्या बाप्पाचा "सुखकर्ता" कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडेल यात शंका नाही.

म्हणता म्हणता मंडळाचा 2019 मधला हा पंधरावा कार्यक्रम! "रसिका तुझ्याचसाठी" या मालिकेचे आपण ३ वेगळे आणि हटके कार्यक्रम सादर केले. स्पोर्ट्सचे प्रोग्रॅम्स, मुलांसाठी फोर्ड फॅक्टरी टूर आणि "आरोग्यम् धनसंपदा" (Health is wealth) ही नवीन मालिका आपण यावर्षी चालू केली; याच्या अंतर्गत योगाथॉन आणि डॉ. दीक्षित यांचे "Effortless Weightloss and diabetes prevention" यावर lecture आयोजित केले होते. त्याला आपण भरभरून प्रतिसाद दिलात; त्याबद्दल धन्यवाद! याच मालिकेतील ५ K वॉकॅथॉन १५ सप्टेंबरला आयोजित केले आहे. तरी सर्वांनी यात भाग घ्यावा ही विनंती!

यानंतर आपला कोजागिरीचा कार्यक्रम २८ सप्टेंबर रोजी होत आहे. यासाठी भारतातून श्री.चारुदत्त आफळे हे त्यांच्या खास शैलीत श्रीकृष्ण कीर्तन आणि संगीत नाट्य-छटा असा अत्यंत वेगळा कार्यक्रम घेऊन येत आहेत. हा कार्यक्रम भारतात तसेच अमेरिकेत लोकप्रिय ठरलेला आहे; तरी चुकवू नये.

# स्नेहबंध

आपला यंदाचा दिवाळीचा कार्यक्रम १३ ऑक्टोबर रोजी होत आहे. यावर्षी नाटकवेड्या डेट्रोइटकरांसाठी खास मेजवानी घेऊन येत आहे श्री.भरत जाधव यांचे अत्यंत गाजलेले नाटक "पुन्हा सही रे सही"....! तरी सर्वांनी चांगल्या जागा मिळण्यासाठी ऍडव्हान्स बुकिंग करा ही विनंती.

*आमचे सर्व कार्यकर्ते आपापले व्याप सांभाळून मंडळाच्या कामाला वाहून घेत आहेत. त्यांच्या मेहनतीमुळेच आपण असे भरगच्च कार्यक्रम करू शकतो. तरी जाता - येता त्यांच्या श्रमाची पावती द्यायला विसरू नका!!*

आपली विश्वासू

**भारती मेहेंदळे**

**अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ ऑफ डेट्रॉईट**

**ई-मेल: bharati.mehendale@mmdet.org**

**फोन: ७३४-६७४-३६८७**



## कमिटी स्पॉटलाईट

### “अन्नदाता सुखी भव”

MMD चा कार्यक्रम म्हटलं की कार्यक्रम काय आहे याबरोबरच मेनू काय आहे याची आपल्या सर्वांनाच उत्सुकता असते. आपली MMD ची फूड कमिटी आपल्याला चविष्ट मिष्टान्न देण्यासाठी सतत कार्यमग्न असते. दर वेळेला काहीतरी नवीन देण्याची त्यांची धडपड असते. मेनू ठरवताना लहान-थोरांना सर्वांना आवडेल, सर्व जीवनसत्वं, प्रथिनं यांचा समावेश असेल, पदार्थांची रंगसंगती छान दिसेल, 10 खणी ताटात मावेल, केटररला बनवता येईल आणि नसेल येत तर रेसिपी देऊन आपल्या मराठमोळ्या चवीचे त्याच्याकडून बनवून घेणे एक ना अनेक! बरं एकदा मेनू ठरला की पुढे त्याची मांडणी कशी करायची, बुफे पद्धतीत फार रांग होणार नाही यासाठी किती स्टेशन्स करायची, टेबलाच्या दोन्ही बाजूंनी वाढून घेण्यासाठी किती सर्व्हिंग कटलरी लागेल, आवडते पदार्थ सर्वांना पुरे पडायला हवे….



शिवाय या सर्व योजना बजेटमध्ये पण बसायला हव्या. या सर्वांची कसरत सांभाळत, ही सर्व जबाबदारी अगदी बिनदिक्कत पार पाडणारी आपली फूड टीम… दीपा इंगळे, ऍश नाईक आणि शिरीष भिडे यांच्या लीडरशिपखाली ही संपूर्ण टीम पडेल ते काम करत असते त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच ! गेली कित्येक वर्ष दीपा प्रत्येक सणाला खास घरी कढवलेले तूप करून आणते. चमचमीत खाणाऱ्यांसाठी लोणच्यांचीही सोय केलेली असते. बुफे स्टेशनवरचा पदार्थ संपायच्या आत दुसरा ट्रे तयार असतो. शिवाय जेवण झाले तरी यांचे काम संपलेले नसते. सर्व उरलेल्या पदार्थांचे नियोजन, कॅरी आऊट डब्यात भरून सर्वांना नेण्यासाठी टेबल तयार असते. पुन्हा सर्वांना वेलची आणि आल्याचा गरमा-गरम वाफाळणारा चहा हवा म्हणून पुढची लगबग चालू होते. आणि शेवटी असतो क्लीनअप टाइम!

या सर्व धांदलीत बऱ्याचदा त्यांना प्रोग्रॅम बघायलाही मिळत नाही; तरीही त्याची तक्रार न करता ही टीम काम करते त्या सर्वांसाठी एकच म्हणावेसे वाटते **“अन्नदाता सुखी भव”**… !!!

## Youth Committee Rocks!!!

When I took the presidency this year, I started regular dialogue with youth committee who is future face of MMD. Warsha Kulkarni accepted as Youth mentor who is amazing with kids. Our motto was to drive kids to think and come up with the programs they would like to see at MMD, which will also give them the opportunity to learn our culture and personality growth. They started the year with bang by volunteering at Gleaners and planned activities throughout the year. They are always eager to help out with decoration, table set up and babysitting for every program. I am very proud of them and wish them the very best for taking forward MMD baton. Youth committee Rocks...!!!





# कमिटी स्पॉटलाईट

## “ढोल बाजे...”

आपल्या लाडक्या गणरायाचे वाजत-गाजत स्वागत करायला ढोल-ताशा हवाच...! यंदाची आपली ढोल-ताशा-लेझीम टीम सर्वात मोठी 35-40 जण अगदी उत्साहाने प्रॅक्टिसला लागलेत. प्रणव औंधकर आणि मुकुंद वानखेडे यांनी आपण होऊन या टीमचे प्रतिनिधित्व करण्याची तयारी दाखवली आणि म्हणता म्हणता एक भली मोठी टीम तयार झाली. सर्वांना संधी मिळण्याच्या दृष्टीने सर्व साहित्य जमवून त्यांची सद्यस्थिती याची पाहणी करून त्याच्या डागडुजीसाठी भारतातून एक शिपमेंट मागवायचे ठरले. हे सर्व साहित्य वेळेत येऊन सर्व ढोल, त्याची पाने, आकडे यांची बांधाबांध सुरु झाली. झेंडे तयार झाले. आपली MMD ची टीम इंडिया डे च्या नोव्हाय शोकेस मध्ये झालेल्या परेडमध्ये अगदी अग्रभागी झळकली. त्याचे कौतुक चीफ गेस्ट विवेक ओबेरॉय यानेही आवर्जून केले.

हीच टीम आता आपल्या गणेशोत्सवात तर तुम्हाला दिसेलच पण इतरही बऱ्याच ठिकाणी त्यांना आमंत्रणे येत आहेत. MMD च्या झेंड्याखाली ही टीम ढोल-ताशे वाजवताना सर्वत्र आपल्याला दिसेल तेव्हा आपली छाती अभिमानाने फुलून येईल. Hats off to the Team and Good Luck to give your best performance as always...!!



- भारती मेहेंदळे

# Happy Travelling

## . . .at the lowest price

Clickontours·com

*Holiday just a click away!*

ClickOnTours is a full-fledged travel agency dedicated to the comfort of travelers. Our offices are located in Canada, US, UK and India.

From most economical airfares, cost-effective and customized hotel bookings, business tours, world cruises, family holiday packages, to car rentals, we offer the finest feast of services for every travel need.

**Enjoy lowest airfare for business economy on any airline**

**Find the best cruise easily with the help of our experts**

**Lowest hotel room tariff within USA & across the world**

### Key features:

- Cost-effective & customized airfares, hotel bookings, car rentals
- Lowest rates guaranteed
- Affordable world cruises (USA / Canada / UK / Australia / India)
- Exclusive vacation packages from Alaska to Auckland
- Worldwide service centers

For the best travel deals,
call us on **+14252562109** *OR*
contact us on **sales@clickontours.com**

**Toll-free 877 239 1312**

# स्नेहबंध

## पिंडे पिंडे प्रितीर्भिन्ने...

रात्रीचे ११:३०. फोन खणखणला. "त्याला माझी जरासुद्धा किंमत नाहीये" ती रडकुंडीच्या स्वरात बोलत होती. फारच चिडचिड झाली होती तिची. पुढचे काही तास ती रडून मला तिची "व्यथा" सांगत होती आणि मी तिची समजूत घालायचा प्रयत्न करत होते. गर्भार्थ हा होता की; तिला "काय हवंय" याच्याकडे त्याचं लक्ष तर नसतंच, वर तो चुकलाय असंही त्याला वाटत नाही. "किती सहन करायचं माणसानी? लग्न मोडतेय मी. घर सोडून जातेय. तोंडसुद्धा बघायचं नाहीये मला त्याचं ह्यापुढे. तूच त्याला माझा हा निरोप दे" – तिने गळ घातली. अकरावीपासुन त्यांचं प्रेमप्रकरण. तेव्हापासूनची आमच्या तिघांची मैत्री. अगदी जिवाभावाची. दोघांचं एकमेकांवर खूप प्रेम. घरच्यांची मंजुरी मिळाली. थाटात लग्न लागलं. आता त्यालाही अनेक वर्ष झाली म्हणा. तो त्याच्या करियरमधे यशस्वी, तीही तिच्या कामात. म्हणजे सर्वसाधारण घरासारखंच यांचं. उद्या बोलायचा वायदा करून मी तिला कसंबसं शांत केलं; आणि तिने फोन ठेवला तेव्हा पहाटेचे ४ वाजत आले होते.

सकाळी ६ ला फोनच्या घंटीनेच गजराचं काम केलं. या वेळेला दुसऱ्या बाजुला तो! "अरे मी तुला फोन करणारच..." माझं वाक्य अर्ध्यातच तोडून त्याने बोलायला सुरवात केली. स्वारी महागुश्शात होती. "तुझी मैत्रीण स्वतःला नं; महाराणी समजते. एवढी मग्रूरी कोण सहन करणार! नाटक संपतच नाही हिचं. काहीही करा... तरी परत आम्ही चूकच! आणि या बाईसाहेब... त्या नेहमीच बरोबर. लग्नाआधी होतं का हे असं? तूच सांग. अरे मी ऑफिसला जातो ते काय मज्जा मारायला? आणि आता इतकी वर्षं झाली लग्नाला, सारखं हिच्याशी गुलुगुलु बोलत बसणं कसं जमणार?" मी काही बोलायच्या आधीच तो कडाडला. मला आपण ढोलकी असल्यासारखं वाटत होतं. दोन्हीकडून मला थपडा पडत होत्या. नक्की मामला काय हे समजायचा मी माफक प्रयत्न केला; तर त्याने मलाच फैलावर धरलं. "तू... तू तिला नीट समजावून सांग. तुला माहीत आहे, हे असलं काही खपवून घेणाऱ्यातला नाहीये मी. नाहीतर आपलं नातं संपलं म्हणावं". आणि फोन आदळला.



आता आली का पंचाईत! अहो, वाद कुणात होत नाहीत!!! भांड्याला-भांडं कधीतरी लागणारच. पण घर मोडण्याइतक्या थराला जाईल, असं काय झालं असेल? निश्चित काय झालंय कळायला काहीच मार्ग नव्हता. बरं दोघेही तसे समंजस. मग का दोघेही अशी टोकाची भूमिका घेताहेत? असं म्हणतात ना - एकाचं ऐकलं की साखर खाल्यासारखं वाटतं आणि दुसऱ्याचं ऐकलं तर गूळ. पण दोघांचं ऐकलं तर... जाऊ दे! म्हणजे, हे दोघे कितीही नाही म्हणाले तरी त्यांना आमने-सामने आणायला हवं! म्हणजेच काय तो सोक्षमोक्ष लागेल. झालं! धूर्तपणे आमच्या जुन्या अड्ड्यावर संध्याकाळी बोलावलं. असं ठरलं की दोघांनीही आपापल्या बाजू मांडायची. मी जज्ज-ज्युरी!

बराच वेळ चाललं हे घमासान! कुणीच तलवार म्यान करायला तयार दिसत नव्हतं. शाब्दिक ठिणग्या दणादण उडत होत्या. खरं तर ते सगळंच संभाषण तुम्हाला सांगायला मला आवडलं असतं. पण त्यासाठी ३-अंकी नाटक सुद्धा कमी पडेल. मिनी-सिरीज करावी लागेल! तेव्हा संक्षिप्तात सांगते. ज्या कथेची सुरवात "मला वेड लागले प्रेमाचे..." अशी झाली होती, ती आता "उसवलं गणगोत सारं..." पर्यंत येऊन पोचली होती! म्हणजे दोघांनाही असं वाटत होतं, दुसऱ्याचं आपल्यावर प्रेम नाही. म्हणजे त्यांच्याच शब्दात सांगायचं तर... "याने पेहेल केली. तेव्हा गोड बोलायचा. माझ्याबरोबर तासंतास गप्पात रंगायचा. लाडाने कधी "शोनु", कधी आणखीन काही म्हणायचा. पण आता... आता अव्वल! याला सवडच नसते गप्पांसाठी. सारखं "काम". बरं, असतो तेव्हा तरी प्रेमाने वागावं. छे! ते सुद्धा क़्वचित. कौतुकाचे चार शब्द तर नाहीच, पण चुका दाखवण्यात पहिला नंबर. जवळ घेणं सोडा, साधं - तू आवडतेस - असं कधी म्हटलं होतं शेवटचं, ते आठव म्हणावं जरा!" इति ती.

आणि तिसरी आमची आजी! आता हिच्याबद्दल तर सांगावं ते कमीच. मूळची कोकणी आजी सासरी आल्यावर मराठी शिकली. पण तिला हिंदी फारसं बोलता यायचं नाही. पण म्हणुन काय! घरी येणाऱ्या भाजीवाल्याशी मात्र ती फाड-फाड हिंदीतच बोलायची. म्हणजे बघा हं – "क्या रे भैय्या, तू काल का नाही आया? आधी सांगनेका ना. आणि भाव इतना महाग क्या लावता है? मार्केट में तो स्वस्त है". खरं तर आजी फारच क्वचित घराबाहेर पडायची. अगदी गेलीच तर आमच्या सोबत उद्यान-गणपती किंवा मठात. खरेदी वगैरे तर कधीच नाही. पण तरीही होरा असा की आत्ताच बाजारातून आली आहे. कहर तर नारळ घेताना असायचा. कारण नारळ म्हणजे आजीचा जीव की प्राण. आमटी, भाजी, वरून भुरभुरवून.. हजार वेळा सतत लागायचा. पण खवून ठेवलेला मात्र चालायचा नाही. तेव्हाच्या तेव्हा खवायचा. मग वेळी-अवेळी "पटकन खवून दे" अशी आज्ञा यायची. चुकुन जर पांढऱ्या खोबऱ्यात काळा ठिपका दिसला, तर पाठीत एक पडलाच म्हणुन समजायचं. दहा वेळा टणटण वाजवुन, परखून घ्यायची. वर "भैय्या, नीट बघून देओ. कुजका निकला ना, तो उद्या परत!" अशी इरसाल हिंदी धमकी. आणि नऊवारीतल्या आमच्या मराठमोळ्या आजीचं धेडगुजरी हिंदी भैय्याला व्यवस्थित समजायचं देखील. तो त्याच्या हिंदीत बोलायचा आणि आजी तिच्या. दोघांनीही आपापली भाषा सोडली नाही. मोलभाव यथासांग व्हायचा. दरवेळी तीच झिकझिक. नारळ कधीही कुजका निघाला नाही हे नशिब आमचं. पण म्हणून आजीकडून एखाद्या वेळी सांगायचं राहिलंय? तर नाही! काय आहे की नाही आमची "हिराठी" आजी स्पेशल? पप्पा, दादा आणि आमची आजी तसे साधारण एकाच वयाचे. पण तिघांमधे वय सोडलं तर तसं काहीही साम्य नाही. जगाच्या रांगोळीत प्रत्येकाचा रंग विशेष आणि वेगळा. आणि तोही ठळक!

आणि मग.... बेल वाजली! दार उघडलं तर समोर एक विशीतला मुलगा. कानडीत काही तरी म्हणाला. त्यातलं "धारवाड" आणि "अण्णा" हे दोन शब्द मला कळले. हातातल्या सामानाकडे बघता धातर त्याचं म्हणणं - "सुरवातीला ठीक आहे, पण आता लग्न होऊन इतकी वर्षं झाली. मग सारखं कशाला सांगायला हवं ही आवडते ते? ते अध्याहृत नाही का? उगीच वेळात वेळ काढुन हौस पुरवतो का तिची सगळी? न सांगता, आठवणींनी हिच्या आवडीच्या गोष्टी कोण करतं? पण चांगलं केलेलं दिसतच नाही! आणि एखादी गोष्ट चुकली तर प्रांजळपणे सांगण्यात काय चुकलं? नवरा-बायको मधे ट्रान्स्परन्सी हवी. मला नाही जमत चोंबाळणं. नॉट मी".



हं. दोघेही आपापल्या जागी बरोबर होते. तिला गोड शब्दांची, वेळी प्रेमळ स्पर्शाची अपेक्षा असणं काहीच चुकीचं नव्हतं. आणि शब्दात व्यक्त करून प्रेम दाखवण्यापेक्षा कधी अनपेक्षित पण तिला आवडतील अशा कृत्यातून दाखवावं हा त्याचा दृष्टीकोनही अयोग्य म्हणता येणार नाही. चुकलं तर दरवेळी दाखवून कशाला द्यायचं अशी तिची इच्छा बरोबरच तर (अति)परिचयामुळे कदाचित त्याला तो शिष्टाचार वाटत होता. काही दृष्ट्या नातं गृहीत धरलं जात होतं. त्यामुळे हा "तू चूक.... तू बरोबर" असा ब्लॅक-अँड-व्हाइट निवाडा नसून, इथे सगळाच रंगबिरंगी कारभार होता. दोघेही एकमेकांवर आजही जिवापाड प्रेम करत होते. तरीही काहीतरी जाम गंडलं होतं. जानव्याची जोड गुंतावी ना; तसला हा गुंता होता आणि तो सोडवायला "गाठ" सापडणं महागरजेचं होतं.

मंडळी, मला सांगा - "आय लव्ह यु", "मला तू खूप आवडलीस", "माझं प्रेम आहे तुझ्यावर" ही वाक्य कित्ती घीसी-पिटी आहेत? किती जागी, किती वेळा, किती लोकांनी म्हटली आहेत त्याची काही गणतीच नाही. हे सुद्धा त्यातलेच एक! सुरवातीचा काळ एकदम सही जातो, मग मात्र बऱ्याचदा हळूहळू कुरबूर सुरु होते - खटके उडतात, "हम आपके ही हैं कौन" चा "वक्त ने किया क्या हसीन सितम" होतो असं म्हटलं तरी चालेल. "ये जवानी है दिवानी" मधे दीपिकाने अत्यंत गोंडसपणे रणबीरला हेच समजावलं होतं - की बाबा रे हे शब्द फक्त सुरुवात असतात. खरी गंमत तर नंतरच येते. कारण हे शब्द लोकांना कधी कधी व्यवस्थित सांभाळता येत नाहीत. प्रेमाच्या संवेदनेतले "संवाद" कुठेतरी हरवतात आणि राहतात फक्त वेदना.

# स्नेहबंध

मग संवाद असेल तर भाषा ही असणार. आणि या "गुंत्याची गाठ" हीच भाषा आहे. पण बोलण्याची नाही - प्रेमाची. आणि प्रॉब्लेम देखील तिथेच आहे! म्हणजे जी समस्या तिचा तोच तोडगा! सॉलिड बुचकळ्यात पडलात ना? उत्तर थोडं फिल्मीसुद्धा वाटलं का? थांबा... खुलासा करते. आता समजा एक माणूस ओरडून, अगतिकपणे एका मराठी मुलीला स्वाहिली भाषेत त्याच्या मनातलं सांगतोय. खुप प्रयत्न करतोय बिचारा.... आणि आपली मराठी मुलगी - तिला काही कळतच नाहीये. पण ती सुद्धा त्याला मराठीत प्रतिसाद देतेय, समजावण्याच्या अतोनात प्रयत्न करतेय. पण त्याला कुठे काय बोध होतोय? दोघेही पराकाष्ठा करताहेत. पण तरीही परिणाम काय? शून्य! आता तुम्ही म्हणाल – बिनडोक आहेस का? अगं, जर दोघांच्या भाषा वेगळ्या; तर कसं कळणार एकमेक काय म्हणताहेत ते?



प्रेमाचं सुद्धा तसंच काहीसं नाही का - एकमेकांवर ते दाखवण्याच्या सुद्धा भाषा असतात. पण एकाची भाषा दुसऱ्याला येत नसेल तर? किंबहुना त्याला ती कळतच नसेल तर? मग... मग भावनांची चुकामुक, अपेक्षा अपुऱ्या, मनांची दुखापत, म्हणजे थोडक्यात - प्यासा मधला “जाने वो कैसे लोग थे जिनके...”

बरं, आता प्रोब्लेम स्टेटमेंट तर कळलं! मग तुम्ही म्हणाल उपाय काय? तसा काही रामबाण उपाय आहे असा काही माझा दावा नाही. पण काही ऐकलेल्या, काही वाचलेल्या, काही अनुभवलेल्या गोष्टींवरून एक तोडगा मांडते. पटतं का बघा. माझ्या माहितीत बोलीभाषा असंख्य आहेत.

पण प्रेमाच्या कदाचित फक्त पाच - नजराणा, सहवास, शब्द, कृत्य आणि स्पर्श... आणि प्रत्येक व्यक्तीची प्रेमाची भाषा यातलीच एखादी असते. काहींना कौतुकाचे "शब्द" आवडतात, काहींना त्यांच्यासाठी काहीतरी केलेलं "कृत्य" भावतं, कुणाचं मन "नजराण्यांनी" मोहरतं, कुणी "स्पर्शाने"; तर काही जणांना "सहवासाची" ओढ असते. तिला त्याच्याकडून प्रशंसेची आशा होती (अर्थात शब्द), त्याला त्याच्या कृत्यातून ते तिला कळावं ही अपेक्षा. त्याला सहवास महत्त्वाचा होता, तर तिला स्पर्श. तो एका भाषेत अगदी जीव तोडून सांगत असला, तरी तिला ती कुठे येत होती! काय? होतोय का उलगडा? अहो! म्हणजे पुन्हा स्वाहिली आणि मराठी! त्यामुळेच ही भावनिक चुकामूक! शेवटी काय... भाषा कुठलीही असो, संवाद महत्त्वाचा. त्याचा जर फक्त "वाद" होत असेल, तर कुठेतरी "सम" शोधायला हवी.

रवाडहून आलाय, आजोबांचं घर का असा काहीसा आशय असावा. काय सही स्वरूप होतं हो त्या “अप्पा”चं. म्हणजे काय? अहो त्याच्या बद्दलच काय, आणखीन खूप जणांबद्दल खूप काही सांगायचं आहे तुम्हाला. आमच्या आसपास “नमुन्यांची" कमी नाही! आणि ह्या सगळ्याचं नंतर काय झालं ते तरी कुठे सांगितलंय मी. आता कुठे मी फक्त झलक दिलीये. बाकी ब्रेक के बाद! तोवर ही सगळी मंडळी तुम्हाला कशी वाटली? वल्ली का आणखीन काही... ते तुम्ही ठरवा. हं, पण मला सांगायला विसरायचं नाही बरं का.

चला तर! गाठ सापडली! गुंता सुटला!! प्रेम होतंच. आता दोघांनीही दुसऱ्याची प्रेमाची भाषा अवगत करून घ्यायचा श्रीगणेशा केलाय. आणि त्यांची गाडी पुन्हा एकदा "प्रेम रंगात रंगुनी.." च्या पटरीवर आलीये!!! हं, पण गोष्ट इथे संपत नाही. आता तुमची बारी - ज्याचावर प्रेम करता, त्याच्या प्रेमाची भाषा ओळखा, त्या भाषेत बोलून बघा... आणि प्रयोग यशस्वी झाला की मला जरूर कळवा!

**- पूनम तोरगल**


Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE®
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

## अशी ही लोकशाही

झुगारुन जुलूमी इंग्रजी दंडुक्याला
किंवा आधीच्या स्वार्थी राजेशाहीला
बोलवावेसे वाटले लोकशाहीला
लोकांनी लोकांसाठी लोकराज्याला

नकोत कोणाचे कर नको कोणाची भीक
कष्ट आमुचे देतील आम्हा पोटापुरते पीक
नाही लागणार आता कोणाचे धराया पाय
उपभोगू आम्ही आपली शेती, देव अन् गाय

पाच वर्षे फक्त मांडले जनसेवेचे ते ताट
नाही मिळणार कोणाला देशाची वहिवाट
षड्रिपूंनी मात्र मांडला त्यांचा सारीपाट
प्रत्येकाने केला फायदा स्वतःचा अचाट

नीरक्षीर नासायाला का ते स्वातंत्र्य कमविले
कधीकुणी या करता का वेडे रक्त सांडिले
काय केले हे लोकांनी लोकांचे स्वार्थामुळे
होतील कधी या लोकशाहीच्या अश्रूंची फुले

**- आशुतोष काळे**

## कधी घ्यावे, कधी द्यावे

कधी घ्यावे, कधी द्यावे
गुलाबाचे फुल
रुजवावी नवी जुनी
मनातली भूल

असूनही परिचित
कुणाचे पाऊल
रोमांचावे अंग अंग
लागता चाहूल

असताना समीप तो
आनंद संमुळ
नसताना जीव व्हावा
भलता व्याकुळ


मध्ये जणू बिंब मी,
तो भोवती वर्तुळ
अवघ्याची संसाराचे
होतसे गोकुळ

**- सुरेश नायर**

# Exclusive Training In Kathak
# at
# ASMI Dance Academy

**Curriculum Based Kathak**
**Certified by Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune**

ASMI






**Batches in Rochester Hills:**
**Tuesday to Friday**
**Time**: 5:00 PM - 9:00 PM
**Venue**: 855, Dunedin Drive,
Rochester Hills, MI - 48309

**Batches in Novi: Mondays**
**Time**: 6:00 PM - 8:00 PM
**Venue**: Center for Performance Arts And Learning
28243 Beck Rd B2, Wixom, MI 48393


For Inquiries Contact:
**Anagha Huprikar**
248-701-5275/asmidanceacademy@gmail.com
Anagha's ASMI Dance Academy


KRISBI TRAVEL
NEW SITE NEW BRAND
SAME GREAT SERVICE
B2C TRAVEL PORTAL
WWW.EZTOFLY.COM
START FLYING THE EZ WAY
✓ One stop shop for all your Travel needs
✓ Custom Tour Packages
✓ Flights
✓ Cruises & much more...
Call Today for a
personalized service
Phone: 248-569-8668
Email: Detroit@krisbitravel.com

# स्नेहबंध

## ।। श्री ।।
## श्री गणेशास अनाहूत पत्र
## श्रावण वद्य ४, शके १९४१

तीर्थस्वरूप श्रीगणेशाच्या चरणी बालके भक्तांचा कृ .शि .सा . नमस्कार !

पत्र लिहिण्यास कारण की आपले आगमन केवळ तीन आठवड्यांवर येऊन ठेपले आहे. सालाबादप्रमाणे याही वर्षी सर्व भक्तांनी तुमच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. आम्ही सर्व तुमच्या स्वागतासाठी उत्सुक आहोत. जरी नुकतेच संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने थैमान घातले असले तरी आमच्या एकंदर सहनशील स्वभावानुसार आम्ही छातीवर दगड ठेवून, क्षणभर ते सारे विसरून तयारीला लागलो आहोत. अद्याप आमचे कोल्हापूर, सांगलीचे बांधव पूर्ण सावरले नाहीत, तरी तुमच्या स्वागतात त्यामुळे फरक पडणार नाही. तुमच्या मुक्कामात आरास, सजावट, व खाण्या-पिण्याची रेलचेल करूनच आम्ही तुम्हाला निरोप देणार आहोत.

आम्ही दरवर्षीच आमच्यावर आलेल्या संकटांची यादी तुमच्या समोर वाचून दाखवत असतो, कारण तुम्ही संकटहारी देवता आहात, परंतु पाहुणचार घेण्यात, मोदक, लाडवांचा आस्वाद घेण्यात तुम्ही एवढे दंग असता की तुम्हाला या यादीकडे लक्ष द्यायला फुरसतही मिळत नाही,असे आम्हाला वाटते. यावेळी तरी वेळात वेळ काढून तुम्ही आमच्या संकटांकडे, गाऱ्हाण्यांकडे लक्ष द्यावे ही देवाच्या चरणी प्रार्थना आहे.

यावर्षी तुमच्या पेहेरावात बदल झालेला आम्ही पाहतो आहे, तुम्ही नखशिखांत भगवे झाला आहात, बाकी कोणी कोणता पेहराव करावा याबद्दल आम्हाचे काहीही म्हणणे नाही शेवटी तो प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न आहे.

बुद्धीचे नायक तुम्ही, तुमची आराधना करणाऱ्या सर्व भक्तांना तुम्ही चांगली बुद्धी प्रदान करता, मग तुमच्या देशात बुद्धी भ्रष्ट झालेले , महिलांवर अत्याचार करणारे नराधम का डोके वर काढतात ? तुम्ही त्यांना अशी भ्रष्ट बुद्धी का प्रदान करता? तुम्हाला माहीत आहे की, तुमच्या मातोश्रीने, पार्वतीदेवीने, काली आणि दुर्गेची निर्मिती करून दैत्यांचा संहार केला. एवढेच नव्हे तर तुम्ही सुद्धा पार्वतीदेवीचे संरक्षण करण्यासाठी आपल्या पिताश्रींचाही मुलाहिजा ठेवला नाही.



पाहुणचार घेताना किमान अश्या आधुनिक दैत्यांना कुबुद्धी तरी देऊ नका, आणि आपल्या भक्तांचा, समाजाचा स्तर उंचावण्याकरिता धावून या अन्यथा पुढच्या वर्षी तुमच्या स्वागताला महिला वर्ग न येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

अतिवृष्टी, दुष्काळ, लहरी मौसम, महिलांवर अत्याचार, भ्रष्टाचार अशा संकटांनी हे परमेश्वरा, तुमचा भक्त ग्रासलेला आहे. पुढील वर्षी अशा संकटांची मांदियाळी सोबत आणू नका म्हणजे तुमचे आम्ही अति भव्य स्वागत करु.

कळावे, अशीच कृपादृष्टी सदोदित ठेवण्याचे करावे,

आपले आज्ञाधारक भक्त-गण

**- बाळकृष्ण पाडळकर**

# CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991

Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?



If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

**Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412**

**Owned and Operated by the Walvekar Family**

20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.

www.centralhomecare.com

## कुठली वाट?

भूगोलात लिहायला, रक्ताची शाई लागते
प्रेम करायला, ह्रुदयाची शाई लागते

लग्नाच्या साक्षीला, शहनाईची साथ लागते
मनाच्या मुक्तीला, डोक्यावरची गाठोडी फेकावी लागते

देहाच्या वृध्दीला, अन्नाची साथ लागते
तर देहाच्या राखेला, अग्नीची साथ लागते

मी कुठे, तू कुठे, रातकिड्यांच्या आवाजाने कान पिकलेत
तुझ्या मिलनाला, कुठली वाट पाहिजे?

**- निरंजन हुंबड**

## Just असंच सहज

Just असंच सहज, एक क्षण घ्यावं जगून
बेफिकिरीचा कोट चढवत, सारं सारं विसरून

आरशात वा सेल्फीत, आपल्याच रूपावर भाळून
बाथरूम मध्ये का होईना, स्वतःची मैफिल जमवून

चियर्स करावं स्वतःलाच, चहा घेताना कपातून
"हर फिक्र को धुएँ में", बशीतली वाफ फुरकून

याद्या, नोंदी, बकेट लिस्ट, दूर द्यावं सारून
आली लहर केला कहर, भान थोडं विसरून

कशाला उगी अट्टाहास, कशाला फुकाचा ध्यास
कल की कल सोचेंगे, आज जगून घ्यावं खास

याची त्याची तरतूद करत, आयुष्य जातं निघून
अध्येमध्ये असंच, सहज, एक क्षण घ्यावं जगून

**- सुरेश नायर**

## आकाशवाणीच्या आठवणी

आकाशवाणीच्या नागपूर केंद्रावर दर रविवारी सकाळी नऊ वाजता लहान मुलांसाठी "बालविहार" हा कार्यक्रम होत असे. सलामीला त्या महिन्याचं समूह गीत, नंतर एखादी लहानशी श्रुतिका, मुलांनी लिहिलेल्या पत्रांची पोच, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं, आणि शेवटी स्टुडिओमध्ये आत्तापर्यंत शांत रहायची शिक्षा दिलेल्या बाल पाहुण्यांना रेडिओवर आपली ओळख सांगून एखाद दोन वाक्यं बोलण्याची संधी, असं त्या अर्ध्या तासाच्या कार्यक्रमाचं ढोबळ स्वरुप असायचं. आपल्या मुलांचा रेडिओवर आलेला आवाज ऐकायला घरची मंडळी खरखर करणाऱ्या रेडिओ भोवती गोळा व्हायची. घरी आल्यावर मुलांचं कौतुक व्हायचं. स्वातंत्र्यप्राप्तीच्या लगोलगची सुरुवातीची वर्षं अशी उत्साहात जायची.

"संजयमामा" आणि "कुंदाताई" या कार्यक्रमाचं संचालन करीत. कार्यक्रमांत काम करणाऱ्या पहिल्यावहिल्या बाल कलाकारांत होती आमची नीनाताई. लहान असतांना तिच्यासोबत मी देखील स्टुडिओत "पाहुणा" म्हणून जात असे. पण ओळख सांगून दोन वाक्यं बोलायचा प्रसंग आला की, माझी बोबडी वळायची. ओठ घट्ट मिटून संजयमामा आणि कुंदाताई, दोघांनाही मी वैताग आणायचो. असं चार-सहा वेळा झाल्यावर एकदा घरी आई देखील माझ्या मुखदुर्बळपणावर चिडली. पण गोदुआत्याने लगेच माझा नेहेमीप्रमाणे कैवार घेतला ... "नाही हो वहिनी, कितीतर छान बोलला तो ... मला अगदी स्पष्ट ऐकू आलं !". कोंकणस्थ आई आणि देशस्थ आत्याबाई यांच्यातल्या प्रचंड फरकाचं याहून वेगळं उदाहरण द्यायची गरज नसावी. 😀

बालविहारचे प्रोड्युसर "संजयमामा" म्हणजे श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर. त्यांनी स्वतः लिहिलेल्या श्रुतिका, समूह गीतं, अजूनही लक्षात आहेत. "कुंदाताईं"ची भूमिका सौ. सुशीला कुलकर्णी करायच्या. नंतर कधीतरी त्यांच्या ऐवजी दुसऱ्याच एक सौ. सुशीला कुलकर्णी "कुंदाताई" झाल्या. आणि त्यासुमारास एक तिसऱ्याच सौ. सुशीला कुलकर्णी आपल्या चमूच्या श्रुतिका घेऊन बालविहारात प्रसारण करायला येऊ लागल्या. नागपूर आकाशवाणीला या नावाच्या किती स्त्रियांनी हातभार लावला कोण जाणे. यथावकाश भीड चेपल्यावर मी देखील बालविहारात आणि नंतर बऱ्याचश्या मोठ्या मंडळींच्या श्रुतिकांमध्ये सोळा वर्षांचा होईपर्यंत कामं केली......



आकाशवाणीच्या चाकोरी बाहेर दारव्हेकरांनी "रंजन कला मंदिर" ही हौशी रंगभूमीला वाहून घेतलेली संस्था स्थापन केली. बालविहार आणि आकाशवाणीवरल्या इतर कार्यक्रमांमुळे त्यांच्या नजरेस पडलेले किती तरी गुणी लहान-मोठे कलाकार उत्साहाने त्यांच्या साथीला आले - शोभा वकील, नलिनी शर्मा, विश्वास काळे, विनय डांगरे, आशा दातार, चंद्रप्रभा दिवेकर, गोपाळ कौशिक, राजा पाठक, गणेश सोळंकी... किती नावं सांगायची? सुरुवातीला बाल-नाट्यसृष्टी साठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतलं, आणि आम्हां पोरा-सोरांना उपाशी राक्षस, काबुलीवाला, पऱ्यांचा महाल, मोरूचा मामा, नारदाची शेंडी, अब्रा की डब्रा सारख्या कितीतरी धमाल स्वलिखित नाटकांची मेजवानी दिली.

१ मे १९६० मध्ये नाग-विदर्भ महाराष्ट्रात विलीन झाला, आणि दारव्हेकरांच्या संस्थेने पुढल्या किती तरी वर्षांतल्या राज्य नाट्य-स्पर्धांमध्ये ओळीने दरवर्षी उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट नाट्य-संहिता, उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट संगीत, उत्कृष्ट नेपथ्य, उत्कृष्ट अभिनय अशी बहुतेक पहिली पारितोषिकं पटकावली. यात लेखक, दिग्दर्शक आणि रंजन कलामंदिराचे संस्थापक म्हणून आमच्या संजयमामांचा सिंहाचा वाटा होता. चंद्र नभीचा ढळला, वऱ्हाडी मानसं, काळी माती खारं पाणी, नयन तुझे जादूगार, कट्यार काळजांत घुसली, अशी ही किती तरी नाटकं प्रेक्षकांची मनं जिंकून गेली. हौशी आणि व्यावसायिक रंगभूमीतला फरक दिसेनासा होत होत नाहीसा झाला. यानंतर जे घडलं ते अपरिहार्य होतं. दारव्हेकरांनी व्यावसायिक रंगभूमीवर दिग्दर्शकाच्या भूमिकेत पदार्पण केलं. शिरवाडकर, वसंत कानेटकर, यांच्या सारख्या सिद्धहस्त लेखकांच्या नाट्यकृतींना त्यांनी रंगभूमीवर बहर आणला. नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला, गारंबीचा बापू, अश्रूंची झाली फुले, अशी ती सुरेख नाटकं प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली.

# स्नेहबंध

अतिशय कडक शिस्तीचे दिग्दर्शक म्हणून त्यांचा दरारा या दरम्यान कधीतरी पुण्या-मुंबईकडे पसरला असावा. पण बालविहाराच्या विश्वातले आमचे संजयमामा मितभाषीआणि शिस्तीचे जरी असले, तरी "कडक शिस्तीचे" म्हणजे काय ते आम्हाला कळायची कधी वेळच आली नाही. आज विचार करताना वाटतंय, त्यांच्या शिस्तप्रियतेची बीजं त्यांच्या आकाशवाणीच्या कारकीर्दीत अंकुरली असावी. रेडिओवरचे कार्यक्रम म्हणजे मिनिटं आणि सेकंद यांची गणितं करून आखलेले. लाईव्ह प्रसारणाच्या वेळी थोडं देखील मागे-पुढे झालं तर पुढच्या कार्यक्रमांचं टाइम-टेबल खराब होणार, ते पाप कुणाही प्रोड्युसरला करायचं नसायचं. म्हणून तर आधी तालमी व्हायच्या. कार्यक्रमात जितके नवशिके अधिक, तितकी तालमीची संख्या आणि लांबी वाढायची.

एकदा बालविहारासाठी एक पौराणिक श्रुतिका ठरली होती, "समुद्र मंथन". भाग घेणाऱ्यांत देव, राक्षस, नारद मुनी वगैरे पात्रं . रंगभूमीवर दोन प्रवेशांमध्ये किंवा दोन अंकांमध्ये पडदा टाकतात, तसं श्रुतिकांमधल्या दोन प्रवेशांमध्ये वाद्य संगीताचा १०-१५ सेकंदांचा तुकडा घातला जायचा. पण संहितेमध्ये काट-छाट करून देखील श्रुतिकेची लांबी जरा जास्त होत होती. प्रसारणाची वेळ अगदी जवळ येत होती. फारसा विचार करायला वेळ नव्हता. संजयमामांनी आम्हा पोरांसमोर गंभीर चेहेऱ्यानी हा प्रश्न मांडला. "आतां काय करावं?" विचारलं. त्याच्या डोळ्यांत मिस्कील चमक होती असं आज लिहिताना आठवतंय, पण त्या क्षणी मात्र आम्ही बावरून गेलो होतो. एवढी मोठी जबाबदारी पेलायची आमची तयारी कुठून असणार? पण मग आमचा फार अंत न पाहता संजयमामांनीच चटकन तोडगा काढला. प्रवेशांमधल्या गॅप्स दाखवायला नारद मुनींच्या वीणेचे दोन-तीन सेकंदांचे झंकार वापरले, आणि नियोजित वेळात श्रुतिका सादर झाली. श्रुतिकेत काम करणाऱ्यांसाठी एक लोंबणारा मोठासा मायक्रोफोन असायचा. त्याच्या आजूबाजूला मोठे स्क्रूभोवतीचे नट्स असायचे. त्यांना संजयमामा "मायक्रोफोनचे कान" म्हणायचे. त्यापुढे बोलणाऱ्या मुलांना संजयमामांची सूचना असायची. "हा मायक्रोफोन दोन्ही कानांनी बहिरा आहे. त्याच्या पुढल्या-मागल्या बाजूंनी बोललेलंच फक्त त्याला ऐकू येतं, आजू-बाजूंनी बोललेलं ऐकूं येत नाही. नीट लक्षात ठेवा."



प्रसारण सुरु झालं, की भिंतीवरचा लाल दिवा लागायचा. आता बोलणाऱ्या व्यक्तीशिवाय सगळ्यांनी शांत रहायचं असायचं. त्या मोठ्या मायक्रोफोनच्या दोन बाजूला वाचायचे कागद हातांत घेऊन मुलं आपापली पाळी कधी येते, त्याची वाट बघायची. वाचून झालेला कागद हलकेच बाजूला सोडायची. शेजारच्या कुणीतरी तो कागद आवाज न करता हलकेच बाजूला नीट ठेवायचा.

दारव्हेकरांच्या समूह गीतांचे दोन प्रकार होते. एक म्हणजे स्फूर्ती गीतांचा. उदाहणार्थ "आला किनारा-आला किनारा, निनादे नभी, नाविकांनो इशारा". त्या वयात या गाण्यांतला आनंद, उत्साह, मला कधी कळलाच नाही. समुद्र तर सोडाच, पण अंबाझरी तलावाहून मोठा जलाशय मी बघितला नव्हता. आणि त्या तलावावर होड्या, नाविक वगैरे कोणीच कधी दिसायचे नाहीत. पुढे कधीतरी रामटेकचं खिंडसी सरोवर बघितलं. त्यात म्हणे मगरी वगैरे असत. होड्याही असायच्या. मालाडच्या मारवे बीच वर समुद्र पहिल्यांदा बघितला, तेव्हा त्याचं पाणी खरोखर खारट होतं की नाही, याची चोरून खात्री करून घेतल्याचं आठवतं. माझे "बावळे दिवस" वर्षानुवर्षं टिकले. बहुधा तो नागपूर-विदर्भातल्या पारंपारिक ऐसपैस वृत्तीचा एक भाग असावा.

"मामांची चंची" या मालिकेतल्या दुसऱ्या प्रकारच्या समूहगीतांची सुरुवात "आले, आले, संजय मामा, आता लागतिल आपुल्या कामा" अशी व्हायची, आणि गीतातल्या घडामोडी आटोपल्या, की संजयमामा "करमणूक तर झाली तुमची, बंद करावी आपुली चंची, बरंय मंडळी, निरोप घेतो, फुरसत मिळता पुन्हा कधी येतो ! बरंय मंडळी राम-राम, अहो राम-राम मंडळी राम-राम" अशी सांगता करायचे. यावेळी आम्ही पोरंही उत्साहानं संजयमामांना "राम-राम" करीत निरोप द्यायचो. या बालगीतांमध्ये विदर्भातल्या कुणा आडवाटेच्या खेडेगावी राहणारी एक भोळी-भाबडी म्हातारी "बहिणाबाई" असायची. बाहेरच्या मोठ्या जगांत घडलेल्या बातम्या तिच्यापर्यंत पोहोचल्या, की तिच्या विश्वात उलथा-पालथ व्हायची. त्या उलथापालथीची गोष्ट संजयमामा सांगायचे आणि मग गीत नेहेमीच्या "राम-राम" ने संपायचं.

१९५७ साली सोवियट रशियाने इतिहासातला पहिला स्पुटनिक पृथ्वीप्रदक्षिणेसाठी अंतराळात पाठवला, त्याची बातमी आम्हा बालविहाराच्या श्रोत्यांना संजयमामांनी बहिणाबाईच्या समूह गीताद्वारे अशी कळवली ...




बहिणाला बाळचंद्र दिसला, दिसला...
बहिणाला बाळचंद्र दिसला
त्याला पाहून, त्याला पाहून...
मुखचंद्र हासला तिचा
हासला तिचा, हासला ...
अहो, बहिणाला बाळचंद्र दिसला ...

बहिणाबाईला बाळचंद्र दिसून आजमितीला साठाहून अधिक वर्षं उलटली आहेत. चंद्रयान-२ चंद्राकडे झेपावलं आहे. यथावकाश त्यावरचं रोव्हर पृथ्वीवरून आजवर कधीही न दिसलेल्या चंद्राच्या अंधाऱ्या भागात उतरेल, उंडारेल. पृथ्वीवर फोटो पाठवेल. आम्ही ते कधी काळच्या बावळ्या कुतुहलाने बघू. मग आमच्या मनांत अजूनही तरुण असलेलया म्हाताऱ्या बहिणाबाईचा सुरकुत्या पडलेला मुखचंद्र पुन्हा एकदा जुन्या नवलाईने हसेल आणि काळाच्या अंधारात दडलेल्या आमच्या संजयमामांच्या चेहेऱ्यावर कुठेतरी स्मित तरळेल.

।। तथास्तु ।।

**- सिद्धार्थ शास्त्री**




**7-night luxury Bollywood cruise on Royal Caribbean's *Ovation of the Seas* EXCLUSIVE to guests of Jaya Travel.**



## Dhoom Dhamaka cruise features:

- Concert for guests only by famous Bollywood music artists
- Mind boggling ESP show
- Party with Video DJ
- Delicious Indian cuisine (vegetarian, non-vegetarian and Jain)
- Unforgettable fun for all age groups
- And more!

## Port of call:

Juneau, Skagway, Dawes Glacier, and Victoria British Columbia

## Sailing July 3rd - 10th, 2020

Departure/arrival from Seattle

**Ask about our low airfare!**

***Space is limited. Call and book today!***

877-359-5292 | JAYATRAVEL.COM

JAYA TRAVEL & TOURS

With Best Compliments
from

# Gangadhar
# and
# Pushpa
# Vaishampayan

## माझे जगणे

Enough झाले रे तुझे बहाणे
कामापुरते सरळ वागणे
सगळ्यांशी मग लाचारीने
असे कसे रे तुझे हे जगणे

स्लेव्हसारखे काम ते करणे
सदा परांचे पाय रे धुणे
अक्कल असूनही ह्या जगती रे
बेअकली सारखे राहणे

लोकांच्या सुख दुःखापासून
स्वार्थी बनूनी दूर राहणे
मदत कुणाला कधी न करता
आशेवरती तुझे चालणे

समजूनी घे रे रीत जगाची
समजूनी घे रे कसाई खाणे
निर्भर होऊनी सोडूनी दे रे
इतरांसारखे तुझे वागणे

**- निरंजन हुंबड**




Authentic Indian Groceries, frozen foods, pickles.
**Proudly serving the Indian community from 2 locations – Canton and Northville**

Canton store:44266 Cherry Hill Rd Canton, MI 48187
Phone: 734-844-6702







Northville store - 16991 Ridge Rd,
Northville, MI 48168.
Phone - 248-773-7345



kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!

**REALTOR®, KASHMIRA DESAI**

**YOUR METRO DETROIT EXPERT**

**View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com**

**Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955**

**realtor.kashmira@gmail.com**

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

---

**Taal Academy**

Learn the versatile

Indian Classical Kathak Dance

with renowned Kathak Dancer,

Manisha Dongre

Locations -

| | | |
|---|---|---|
| Monday to Saturday | Troy | Bharatiya Temple<br>City style Tango studio |
| Sunday | Novi | Detroit India cultural center |

Special Batches for Adults and Moms

248-740-5915
www.manishadongre.com
fb.me/taalkathak



# स्नेहबंध



## प्रिय बाप्पा,

जातो आहेस, जा बाप्पा, रोखणार नाही तुला
फक्त दोन मिनिटे थांब, थोडे सांगायचे आहे मला

अजूनही न चुकता, तू दर वर्षी येतोस
अजूनही काही न बोलता, तू जे हवंय ते देतोस

खूप भारी आहे रे हे जग, जे तू आम्हाला दिलंयस
आणि त्याच जगात अकरा दिवसांसाठीच, आम्ही तुला आणलंय

जातो आहेस, जा बाप्पा, तसं पण इथे करमणार नाही तुला
एरवी आम्ही खूप बिझी असतो, उगाच बोअर होईल तुला

जातो आहेस, जा बाप्पा, फक्त थँक्यू बोलायचे आहे
कोटी कोटी अपराध आमचे, तू पोटात घातले आहेस,

आजकालच्या जगात येऊनही, तुझे निरागस रुप तू राखून आहेस,
तूच दिलेल्या कलेने आमच्याकडून, तुझी तूच सेवा करवून घेत आहेस,

आम्ही तसे एवढेही वाईट नाही, थोडे चांगुलपण राखून आहोत
अजूनही थोडे भोळे आहोत म्हणून, मूर्तीमध्ये तुला बघत आहोत

जातो आहेस, जा बाप्पा, बस एवढेच सांगायचे होते
तुझ्याशिवाय अजूनही आमचे अडते, हे कबूल करायचे होते

Missing you,

**अनघा नाईक**



## नवी वाट - ओढ एव्हरेस्टच्या पायथ्याची

मागच्याच आठवड्यात मला कामावर एकजण विचारत होता – “तू नक्की या ट्रेकसाठी जायचे कधी आणि का ठरवलेस?” आणि विचार करताना जाणवलं, हिमालयाचे अद्भुत निसर्ग सौन्दर्य हे एक कारण तर होतंच, तसंच हा ट्रेक साधा-सोपा नाही याचीही कल्पना होती, म्हणूनच या उर्मीतून शरीराला आव्हान द्यायची, नेहमी करतो त्या पेक्षा वेगळं काही करायची "खाज" होती बहुधा. एकदा ठरवल्यावर मला हा ट्रेक जमणार नाही किंवा काही त्रास होईल असा विचार माझ्या डोक्यात कधी आलाच नाही.

आमच्या डेट्रॉईट ग्रुपमध्ये सात जणात मी एकटी स्त्री होते, त्यामुळे मला इथल्या काही भारतीय लोकांनी तेही विचारले "तू एकटीच जाणार?" हा ही प्रश्न मला कधी पडला नाही. आमचा डेट्रॉईटचा ग्रुप तर एकदम मस्त होता आणि बेस कॅम्प ला गेला तो पूर्ण ग्रुप ही, २५ जण असल्याने त्यात ही थोडे छोटे ग्रुप्स झाले होते, पण सगळेच लोक हसत खेळत, एकमेकाला मदत करायला नेहेमी तयार असायचे. त्यातही इतक्या छान मैत्री झाल्या की पुढच्या ट्रिपची बोलणी पण सुरु झाली.

महाराष्ट्र मंडळाने आमच्या डेट्रॉईट चमूला बोलवून "रसिका तुझ्याचसाठी" या सदरा मध्ये “EBC –ट्रेक” वर कार्यक्रम सादर केला. त्यात आम्ही सर्वांनी थोडे फार आपले वैयक्तिक अनुभव सांगितले होते, अर्थात वेळेअभावी सगळे सांगणे अवघड होते. त्यामुळे इथे (overall) अनुभव, काही बारीक-सारीक गोष्टी आणि राहून गेलेले काही सांगायचा प्रयत्न आहे.

मला स्वतःला विचाराल तर मी सांगेन हा ट्रेक आयुष्यात प्रत्येकाने करावा, याची अनेक कारणं आहेत. हा ट्रेक निसर्गरम्य, मनोहर तर आहेच, काही काही वेळा चढताना नदी सतत साथ देते, नदीचा तो खळखळणारा आवाज चढण्याचे सगळे श्रम दूर करतो, तर काही वेळा बोडके उंच कळस समोर येतात, भीती वाटते, भव्यता जाणवते आणि आपण किती क्षुल्लक आहोत ह्याची पदोपदी जाणीव होते. या ट्रेकला खूप glamor आहे, अर्थात हा ट्रेक सोपा अजिबात नाहीये, पण स्वतःची fitness level / तब्येत जर चांगली ठेवली असेल, कुठलेही रोग (heart issues, any other serious health issues) नसतील तर हा ट्रेक मजा करत जमण्यासारखा आहे. तसंच हा ट्रेक चांगला pace out केलेला आहे, त्यामुळे विश्रांतीला आणि जसे चढत जाऊ तसे तसे त्या उंचीची शरीराला सवय व्हायला पुरेसा वेळही दिला गेला आहे. या माझ्या सांगण्यामध्ये मला या ट्रेकचा मोठेपणा आणि अवघडपणा कमी करण्याचा अजिबात हेतू नाहीये, कारण काही येणारी विघ्ने ही अनपेक्षित आहेत, जसे altitude sickness, आपण जसे जसे वर चढत जातो, तशी हवा विरळ होत जाते आणि प्रत्येकाचे शरीर या विरळ हवेत वेगवेगळा response/ प्रतिसाद देते, काहींना श्वासोच्छवासाला खूप त्रास होतो, दमल्या सारखे होते, oxygen पातळी कमी होते आणि बरेचसे. हे त्रास कोणाला होतील हे सांगता येत नाही. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट - मानसिक शक्ती आणि आत्मविश्वासही जर चांगला असेल तर हा ट्रेक तुम्ही करू शकाल.

माझा स्वतःचा अनुभव सांगते. मी स्वतः एक योगा शिक्षिका आहे, इथे मी रोज न चुकता योगासने-प्राणायाम, meditation करते, जिमला जाते, अधूनमधून marathon धावते, त्यामुळे मी स्वतःवर प्रयोग करायचे ठरवले, मी आमच्या ट्रेकच्या प्रत्येक दिवशी योगासने, प्राणायाम आणि meditation (१-१.१५ तास) रोज सकाळी करायचा निश्चय केला. जसे जसे आपण वरती चढू तसे तसे हे जमेल का, का दम लागेल हे मला बघायचे होते. आणि सांगायला आनंद वाटतो की अगदी शेवटच्या उंचीवर @ १८,५५५ ft (गोरक्षेप) लाही मी योगासने-प्राणायाम दम न लागता करू शकले, या सगळ्याचे श्रेय मी माझ्या इतक्या वर्षांच्या योगसाधनेला आणि cardio प्रॅक्टिसला देईन.

योगासने-प्राणायामात बाकीच्या व्यायामाइतक्या कॅलरीज जळत नाहीत या विचाराने बरेच जण योगासने-प्राणायामाला दुय्यम स्थान देतात, त्या सर्वांना मी मनापासून विनंती करेन की आपल्या या पुरातन पद्धतीचा जर आपण दैनंदिन आयुष्यात उपयोग केला तर; शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारे व्यक्ती strong / कणखर होईल, मी तुमच्या समोर एक उत्तम उदाहरण आहे. प्रयोग नक्की करून बघा.




या ट्रेकला खूप आंतरराष्ट्रीय लोक येतात. त्यामुळे इथे बऱ्याच सोयी चांगल्या झाल्या आहेत, चालायचे नसेल, चढायचे नसेल, तर घोडे, खेचर किंवा अगदी हेलिकॉप्टर या सोयी उपलब्ध आहेत. नेपाळच्या बऱ्याच लोकांचे संसार, रोजी-रोटी यावर अवलंबून आहे. नेपाळी शेर्पा ही तर एक (amazing) विलक्षण जमात आहे, त्यांचे जितके गुण सांगावेत तितके कमीच, मला तर क्षणोक्षणी वाटलं, जणू काही परमेश्वराने असल्या ट्रेकसाठी देवदूतच इथे पाठवले आहेत. त्यांची शारीरिक क्षमता हा तर अभ्यासाचा विषय होईल, जिथे आम्हाला साधे ८-९ lbs bagpack घेऊन चढणे अवघड व्हायचे, तिथे हे शेर्पा ३०-४० lb घेऊन सहज चढायचे, तेही आमच्या दुप्पट वेगाने आणि पोहोचल्यावर परत बाकी सगळी कामे हसतमुखाने करायला तयार.

दुसरी एक विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे, सध्या इथे आपण वेगवेगळी diets / खाणी वाचतो आणि नको तितके प्रयोग करत असतो. प्रोटिन्स, कार्बोहायड्रेट्स सतत मोजत असतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल तिथले सगळे शेर्पा दररोज भात-डाळ, तरकारी (भाजी), पापड, कधी कधी लोणचं हे जेवण सकाळ-संध्याकाळ जेवतात, साधे-ताजे आणि पचायला हलके असा त्यांचा आहार आहे, सगळे शेर्पा एकदम slim आणि fit दिसतात, शरीरावर कुठे ही जास्तीचे fat नाही. दुसरी गोष्ट त्यांच्या जेवणात फारसे काही गोड़ पदार्थ (dessert) नाहीत.


या आमच्या ट्रेकचा मुख्य leader/coordinator होता - मिलिंद भिडे, एकदम उमदे व्यक्तिमत्त्व. Trekking चा भरपूर अनुभव, सगळ्यात शेवटी निघून सर्वात प्रथम पोहोचण्याची शारीरिक क्षमता, बारीकसारीक गोष्टींवरही त्याचे व्यवस्थित लक्ष असायचे. त्याचे एक उदाहरण - तिथे वरती चढत असताना कोणी आजारी पडू नये किंवा सर्दी-खोकला होऊ नये म्हणून प्रत्येकाने बाहेर किंवा हॉटेलमध्ये वावरताना डोक्यावर सतत टोपी किंवा स्कार्फ घातला पाहिजे हा त्याचा आग्रह असायचा, मी काही वेळा टोपी न घालता बघितल्यावर त्याने मला हॉटेल रूम वर् पाठवून टोपी आणायला लावली होती. रोज रात्री जेवणानंतर तो आमच्या oxygen levels तपासायचा.

आमच्या या ट्रीपमध्ये वेगवेगळ्या परिस्थितीत आम्हाला मिलिंद भिडे आणि त्याच्या सहकाऱ्यांचे छान अनुभव आले. पहिल्याच दिवशी (Ramechap to Lukla) हवामानामुळे आमचा ट्रेक सुरु व्हायला उशीर झाला, (plane was delayed due to visibility). Lukla हून आम्ही ३ pm ला चढायला सुरुवात केली तेव्हा पाऊस सुरु झाला होता, पण ४ तासांचा ट्रेक असल्या पाऊस थांबण्याची वाट बघत बसणे शक्य नव्हते. आधीच पाऊस, त्यात संध्याकाळ, ढगाळ वातावरण आणि सूर्यास्त या सगळ्यामुळे अंधार पडू लागला होता, नवीन रस्ता, अवघड चढ, थंडी काहीच अनुकूल नव्हते, त्यामुळे आमच्यातले काही जण थोड्या वेळातच दमले, चालण्याचा वेग कमी झाला, आमच्या या समूहात एक senior जोडपे होते, ते तर अतिशय थकले. त्या बाईंकडून आम्हाला ते पोहोचल्यावर कळले की त्यांच्या बरोबरच्या शेर्पाने त्यांना प्रोत्साहन देत कसे आणले (he kept saying-it is just here,10 more minutes, until they reached Phakding lodge), त्यांच्या नवऱ्याला अगदीच चालवेना म्हणून त्याने खेचराची सोय कशी करून दिली, सगळं सांगताना तिचे डोळे भरून आले. सगळे ऐकल्यावर आम्हाला शेर्पा लोकांची मनापासून मदत करण्याची वृत्ती लगेच जाणवली.

आमच्या समूहात एका बाईला Namache Bazar हुन Devouche ला चढून येताना श्वासोच्छवासाला खूप त्रास होऊ लागला, तिला चढणे इतके अवघड झाले होते की, मिलिंदचा एक सहकारी, यतिन आणि १-२ शेर्पांनी तिला खांद्यांवर हात टाकून Devouche लॉजवर आणले. तो चढ किती अवघड होता हे आम्ही सगळे चढल्याने आम्हाला पूर्ण कल्पना आली होती आणि अशात आणखी एका व्यक्तीचे वजन आपल्या खांद्यावर घेत यतिन आणि शेर्पा चढून Devouche ला आले, हे ऐकून आमच्याकडे खरंच शब्द नव्हते. We were just stunned! लॉजवर पोहोचल्यावर तिला लगेच oxygen लावला, मिलिंद-यतीन दर तासाने तिची oxygen level तपासत होते, एकीकडे त्यांचे Emergency evacuation साठी फोनवर बोलणे चालू होते. माझी रूम पार्टनर Dr. होती, आमच्या समूहात ती एकच मेडिकल Dr. असल्याने मिलिंद तिचा सल्लाही घेत होता, रात्रभर मिलिंद-यतीन-२-३ शेर्पा सगळे जागे होते, मध्यरात्रीत २ दा आमच्या रूमचा दरवाजा वाजवून ते माझ्या Dr. रूम पार्टनरशी बोलले. सकाळी शेवटी patient च्या oxygen पातळीत काही सुधारणा दिसत नाही म्हटल्यावर तिला मिलिंदने परिस्थितीची पूर्ण कल्पना दिली, यापुढे चढणे तिच्या जीवाला किती धोकादायक आहे हे समजावून दिले. त्याच्या अनुभवावरून तिला परत जावे लागणार हे त्याला माहीत असल्याने त्याने हेलिकॉप्टर ठरवले होते. तिच्याशी बोलणे झाल्यावर तिला सुखरुपपणे हेलिकॉप्टरमध्ये बसवून दिल्यावरच आमचा ट्रेक पुढे सुरु झाला. अश्या अनेक अनुभवांवरून जाणवले की तिथल्या खड्तर unexpected परिस्थितीत अनुभवी-खंबीर ग्रुप leader किती महत्त्वाचा ठरतो. तसंच त्याची team ही इतकी छान (helpful) होती की आम्ही सगळे निर्धास्त झालो

असे करत शेवटी आम्ही सगळे Gorkshep ला पोहोचलो (16942 FT), Gorakshep हुन लगेच आम्ही एव्हरेस्ट बेस कॅम्पला निघालो. Gorakshep ला आम्ही साधारण एकच्या सुमाराला पोहोचलो, तेव्हा हवा छान होती, आकाशात सूर्य होता, पण जसे बेस कॅम्पपाशी पोहोचलो, तशी हवा अचानक बदलली. थोडेथोडे बर्फ पडू लागले होते, हवा थंड होऊ लागली, तापमान खाली येऊ लागले होते. Base camp पाशी फक्त Mt. Everest (summit) ला जाणार आहेत त्यांनाच रहाता येते, बाकी सगळ्यांना, तिथे पोहाचले, फोटो काढले की परत फिरावे लागते. परत येताना प्रचंड थंडी वाढली, हाताची बोटे गारठून गेली अगदी MI च्या हिवाळ्याची आठवण आली, कसेबसे कुडकुडत Gorakshep च्या लॉज मध्ये पोहोचलो आणि हुश्य केलं, ठरवल्याप्रमाणे Everest Base Camp (EBC-17598FT) चे आव्हान पूर्ण झाले होते, मनात एक समाधान होते, आनंद होता. अजून एक गम्मत तुम्हाला सांगते-आमचा समूह किती interesting होता याची कल्पना येईल. आमच्या ग्रुप मधल्या senior बाई, त्यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता, त्या स्वतः बरोबर साडी घेउन आल्या होत्या, आणि EBCला पोहोचल्या वर तिथे, असलेल्या कपड्यांवर साडी लपेटून त्यांनी EBCच्या landmark पाशी साडीत छान फोटो काढले आणि स्वतःची इच्छा पूर्ण केली. बघा; किती हा उत्साह…!






EBC च्या दुसऱ्या दिवशी कालापठार (Kala Patthar-18193 FT) ला अगदी सकाळी लवकर ६ AM निघायचे होते. मिलिंदने सांगितले होते, चढायला लागल्यावर ९ वाजता जिथे असाल तिथून खाली यायला लागा; कारण ९ नंतर Kala Patthar ला वारा प्रचंड वाढतो, थंडी वाढते, visibility कमी होते आणि उतरणे खूप कष्टाचे होत जाते. मी Kala Patthar च्या अवघड चढाबद्दल बरंच ऐकलं होतं, त्यामुळे आपल्याला जमेल का अशी थोडी शंका वाटत होती, पण इथेही मिलिंद भिडेने प्रोत्साहन दिले. "तुला नक्की जमेल, don't worry". अनुभवी व्यक्तीचा इतका विश्वास पुरेसा होता, चढायला सुरुवात केल्यावर जाणवत होते की Kala Patthar चा चढ खूप उभा होता, वारा आणि गारवा हेही चढण्याच्या आव्हानात आणखी भर घालत होते. हळूहळू चढत, वाटेत एवरेस्टचे सुंदर दर्शन घेत शेवटी Kala Patthar च्या माथ्यावर पोहोचले.  गम्मत अशी आहे की, Base Camp च्या इथून एव्हरेस्ट दिसत नाही, त्यासाठी Kala Patthar ला चढणे जरूर असते. Kala Patthar च्या माथ्यावरती बौद्ध धर्माच्या प्रार्थनेच्या बऱ्याच पताका लावलेल्या होत्या. तिथे मस्त फोटो काढल्यावर आता ट्रेकची सांगता झाली होती आणि परतीचा प्रवास सुरु झाला. सगळ्या शेर्पा जमातीचा आणि trekkers चा विश्वास आहे की एव्हरेस्टची इच्छा असेल तरच तुम्ही summit ला पोहचू शकता, नाही तर काही तरी विघ्न येतात. त्याचप्रमाणे मीही, बेस कॅम्पचा हा ट्रेक विघ्न न येता पूर्ण झाला, याबद्दल परमेश्वराचे आणि निसर्गाचे आभार मानेन.

**- अंजु वळे**

## तू तू - मैं मैं

तो -
ऑफिस मध्ये शिरताना
भपका तुझ्या स्प्रेचा !
सगळाआटापिटा तुझा
बॉसला खुलवण्याचा !!

बॉसही होतो फारच लट्टू
तुझ्या सिनेस्टाईल मेकअपने !
काय करील पण बिचारा
परेशान असतो पिकल्या केसाने !!

तुझी सवयच पण जुनी
भाव खाऊन जाण्याची !
कटाक्षाने झुलवी साऱ्यांना
जशी हिरोईन बॉलिवूडची !!

ती -
माझा नाही भपका
नाही मी सिनेस्टाईलची !
तुझ्या सारखेच "वासू"
वाट पाहतात माझ्या लाईनची !!

नाही करणार लाडीगोडी
नाही मरणार तुझ्यावर !
तिसऱ्यासाठीच आहे मी
जो मरतो माझ्यावर !!

बॉस अन तू
घाला गळ्यात गळे !
अश्रू पुसून पुसून होतील
लाल लाल डोळे !!

**- बाळकृष्ण पाडळकर**

## नव्या वाटा

नव्या नव्या दिशा मला,
आता अशा गवसल्या
तव्या तव्यात या अशा,
कव्या कधी बहरल्या
मन हे जुळले, वळले अंगणी,
जग ने कळले, विणले स्मरणी ।। धृ ।।

सागरी लाटांनी मोहिलेले मला,
क्षितिजासवे, सूर्याने,
रोखलेले मला,
पण कळले मला आता हे माझ्या अंगणीही आहे दिवा रे
तो पाहुनी, मन लोभुनी, भुलले मी रवीला ।। १ ।।

गगनामध्ये, सूर्यासवे,
भ्रमितसलेल्या गरुडा,
मी पाहता, धैर्य गाठण्या,
सज्ज झाले मी उडाया,
पण कळले मला आता हे,
फुलपाखरूही आहे भला रे,
त्याच्या रंगाने, त्याच्या रूपाने,
रमवितो तो साऱ्या जगाला ।। २ ।।

**- अनघा नाईक**

"Thanks to Maya Prep I earned a perfect composite score on my ACT in addition to scoring in the top 95% on the SAT!"

- Smit, Harvard University



## Welcome to Maya Prep

Applications to America's Colleges and Universities continue to increase every year leading admission rates to shrink. To manage the vast number of applications, schools commonly rely on standardized test scores as a way to screen students.

The SAT and ACT will be two of the most important tests of your educational career.

There are many resources available to all students to prepare for the SAT, ACT, and the PSAT. However to stand out, to truly stand out, you need a mentor and a coach with the skills and expertise and instill in you the strategies, discipline, and rigor required to maximize your potential on test day.

Goals of the Maya Prep program include getting our students admitted to schools and programs of their choice and maximize scholarships.

**It is difficult to prepare for the test, the good news is you don't have to do it alone...**

## The Maya Prep Advantage

- Average SAT Composite Score **improvement of 200 points**
- Average ACT Composite Score **improvement of 4 points**
- Many of our PSAT students have been awarded the $2,500 National Merit scholarship. This scholarship is awarded only to 2,500 students out of about 1.5M applicants.
- More than 100 students with an ACT Composite score of 33 or above (**99 percentile**) including 34, 35, and 36 out of 36. Average composite score of 30 (96 **percentile**)
- Students admitted to **top schools including Harvard, Columbia, MIT, CalTech, University of Michigan, Northwestern, Cornell, UC Berkeley, Notre Dame, Michigan State University, Wayne State, Purdue, University of Virginia, University of Chicago**, and many more!

## What We Offer

- Proven Results
- Qualified Instructors
- Test-Driven Training
- Regularly Graded Homework
- Face-to-Face Classes and Remote Capabilities
- Customized Classes
- Admission Counseling
- Essay Assistance
- In-person/Remote Conferences with Students and Parents
- Specially Crafted Study Material

## About Us

- Motivational teachers with MBAs (Ross School of Business, University of Michigan) with a combined 20+ years of successful teaching experience

Contact Us

**Maya Prep**
30368 Norwich Dr.
Novi, MI 48377
(248) 231-4562
info@mayaconsultants.com

**www.mayaprep.com**

# With Best Compliments from

# Shri & Shashi Thanedar



## माझे राजकीय 'समर'

Shri Thanedar

जून ८, २०१७. स्थळ TechTown, Detroit. नुकताच मे महिन्यात Memorial Day पार पडल्यामुळे मिशिगनचा अनधिकृत summer सुरु झालेला. माझ्यासमोर आज येऊन ठेपलेला 'समर' प्रसंग मात्र मी अधिकृतपणेच माझ्यावर ओढावून घेतला होता!

बाहेर आल्हाददायक सत्तरीतले तापमान, आणि आत हॉल मध्ये AC चालू, तरीही थोडासा उकाडा जाणवत होता – कदाचित अंगावरच्या सूट आणि टाय मुळे असेल किंवा जमलेल्या ४०-एक पत्रकारांपैकी काही जणांकडे असलेल्या झगझगत्या lights मुळे.




माझी तयारी तर जय्यत होती. सवयीप्रमाणे भरपूर अभ्यास केला होता. पण समोर अनेकविध कॅमेरे, लांब मायक्रोफोन, भडक प्रकाशाचे दिवे, आणि मुरलेल्या पत्रकारांचा जनसमुदाय -- अशा मेळयाव्यात तासभर 'उत्स्फुर्तपणे' भाषण देण्याची कल्पना थोडीशी धास्तावणारी होती. एवढ्या कष्टाने जुळवलेल्या भाषणातले महत्वाचे मुद्दे विसरले तर काय? म्हणून शेवटी भाषण वाचायचे असे ठरवले.

समोर बघून बोलायचे, आणि पोडीयमवरच्या मसुद्याकडे फक्त अधून-मधून सहजपणे कटाक्ष टाकायचा, म्हणजे मी वाचतोय असे कुणाला वाटणारही नाही, अशी माझी कल्पना. पण जेंव्हा कागदांकडे पाहिले, तेंव्हा लक्षात आले की मला 'उंच' करावे या सद्हेतूने संयोजकांनी जे काही केले होते, त्यामुळे मला लिहिलेले काहीच नीट दिसत नव्हते -- माझे 'उत्तुंग' व्यक्तिमत्व आणि लिहिलेला मजकूर, यांचा समंवय व्हायचा प्रश्नच उद्भवला नसता!
शेवटी धीर एकटवून, जमलेल्या सभेवर आत्मविश्वासाने नजर फिरवली, आल्याबद्दल त्यांचे आभार मानले, आणि कागद चक्क उचलून 'डायरेक्ट' मुद्द्याला हात घातला –

"I am ready to fight for a bright future for the people of Michigan, and I am pleased and proud to announce my candidacy for the governor of Michigan."

या उजेडातल्या प्रवासात वेडी तहान का
तिच्यावाचून असहाय्य व्हावं इतकी तिची मिजास का?
-- सुधीर मोघे

'Rags to riches' अशा माझ्या प्रवासाच्या पुनरावृत्तीला नुकतेच यश मिळाले होते, आणि मुलांचेही व्यवस्थित चालू होते -- मग ही नसती उठाठेव आता कशासाठी? आणि अत्यंत high-profile निवडणुकीत -- हरणार हे जवळपास नक्की असतांनाही -- वैयक्तिक चिखलफेक झेलत, अमाप वेळ आणि पैसा खर्ची पाडून मी नेमके काय साधले?



नोव्हेंबर २०१६ मध्ये Thanskgiving-च्या सुट्टीत मी जेंव्हा Governor-पदाची निवडणूक लढवण्याचा विचार बायको-मुलांसमोर आणि जवळच्या मित्रांसमोर मांडला, तेंव्हा बहुतेक सर्वांचेही मत असेच पडले की माझे जिंकणे अशक्य आहे, आणि म्हणून मी या फंद्यात पडूच नये -- भारतीय immigrants-नी अनेक क्षेत्रांमध्ये जरी उत्तुंग यश मिळवले असले तरी अमेरिकेतील राजकीय क्षेत्रात आपण थोडेसे नवखेच आहोत. पण शशी, माझी बायको, म्हणाली, "तुमची इच्छा आहे, तर करा.


नील, माझा मोठा मुलगा, नेहमीप्रमाणे, "Why not, Dad? नाहीतरी सोप्या गोष्टी करणे तुम्हाला आवडत नाही, so let's do it" – असं अगदी माझ्या मनातलं बोलला! दोनदा शून्यातून व्यवसाय यशस्वी केल्यामुळे, बिझिनेस-बद्दलची माझी भावना, 'been there, done that' अशी झाली होती. आता काहीतरी वेगळं करायची इच्छा होती –मोठं आणि आव्हानात्मक असं.

मिशिगन-च्या governor-पदाच्या निवडणुकीत जवळपास ५० लाख नागरिक मतदान करतात -- यशस्वी झालो तर भरीव कामगिरीसाठीची ही उत्तम संधी आहे, असे मला वाटले. शिवाय, तत्कालीन गवर्नरांचे दोन term पूर्ण झाल्यामुळे २०१८-ची निवडणूक ही 'open race' होती, आणि अशी संधी परत यायला आठ वर्षं वाट पहावी लागली असती -- माझे तेंव्हाचे वय होते ६३ वर्षांचे, तेंव्हा माझ्या दृष्टीने हे पुढे शक्य होईल याची काही खात्री नव्हती. त्या वर्षी Democratic पार्टीला अगदी अनुकूल असे वातावरणही होते, त्यामुळे ह्या सर्व बाबींचा विचार करून शेवटी मी निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.

माझी राजकारणाबद्दलची आवड तशी लहानपणापासूनच होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. माझे वडील ऑल इंडिया रेडीओ रोज ऐकायचे -- त्यांचे ऐकून झाले, की ते आणि १०-वर्षांचा मी, असे आम्ही राजकारणावर चर्चा करायचो. 'इंदिरा गांधींनी अमुक-अमुक असे करायला पाहिजे,' तर कधी, 'मोरारजी देसाई-ना हे कसे समजत नाही?' किंवा, 'नानासाहेब गोऱ्यान्नी practical विचार करायला हवा,' वगैरे वगैरे. असे मोठे विषय हाताळतांना आमची चर्चा चांगलीच रंगायची, तेच माझे राजकारणाचे बाळकडू असे म्हणता येईल.

शेवटी बिझिनेस विकला, पण राजकारणाला पूर्ण वेळ देईपर्यंत २०१७-चा मार्च महिना उजाडला, आणि उमेदवारी जून मध्ये जाहीर केली. नोव्हेंबरच्या polls मध्ये माझे नाव जेमतेम २% मतदात्यांना माहीत आहे असे लक्षात आल्यामुळे North Carolina-च्या एका मीडिया कंपनीशी करार केला, आणि Superbowl-साठी 30 सेकंदांची जाहिरात तयार केली. त्यानंतर अनेक खुमासदार जाहिराती वेळोवेळी प्रदर्शित केल्यामुळे poll-नंबर सुधरायला लागले. पण ते जसे वर गेले, तसे माझे विरोधकही सतर्क झाले, आणि माझ्यावरचा त्यांचा मारा अधिक प्रखर झाला. त्यातलेच एक उदाहरण म्हणजे, 'हा capitalist गर्भश्रीमंत माणूस socialist विचार करूच शकत नाही -- हा मेंढराचे सोंग पांघरलेला लांडगा आहे,' असा अपप्रचार त्यांनी सुरु केला. माझे भारतातले संगोपन आणि शिक्षण, लहानपणी अनुभवलेली गरिबी, हे बघता माझ्या समाजवादी विचारांबद्दल कोणालाही शंका वाटू नये असे मला जरी वाटले, तरी असे अनेक आरोप सातत्याने घोळवल्यामुळे माझे poll-नंबर घसरू लागले. शेवटी जून २०१८ मध्ये माझ्या सल्लागारांनीही हात टेकले, आणि मला सांगितले की आता आपली जिंकायची तिळमात्रही शक्यता नाही, तेंव्हा तू माघार घे.

मी उलट आमचे बजेट वाढवले -- ३ मिलियन डॉलर्सच्या आमच्या सुरुवातीच्या बजेटने primaries संपेपर्यंत १० मिलियन डॉलर्सचा आकडा ओलांडला. असे करण्यापूर्वी आम्ही सर्वजण घरी चर्चा करून एकत्रितपणे निर्णय घ्यायचो, पण नीलचा मला कायमच खंबीर पाठींबा असायचा. बजेट वाढले, की मी नीलला गमतीने म्हणायचो, “तुझ्या वारस-हक्काची ही रक्कम उडवायला तूच मला प्रोत्साहन देतोयस बरं का.” समीरने, माझ्या धाकट्या मुलाने, मला जेंव्हा विचारले की, “जिंकायचे chances काय आहेत?”, तेंव्हा मी दिलेल्या, “जेमतेम १०%,” या उत्तराने त्याला धक्काच बसला.




आमचा लढा अधिक प्रभावी व्हावा म्हणून आम्ही TV, वेब, आणि सोशल-मीडिया वरच्या जाहिराती वाढवल्या, स्टाफ वाढवला, आणि शेवटपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तरीही primaries मध्ये १८% मते मिळवून आम्ही तिसऱ्या क्रमांकावर पारी आटोपली. सर्वांना अर्थातच खूप वाईट वाटले, पण मला चांगला लढा दिल्याचं समाधान होतं. २११,००० लोकांनी दिलेला कौलही मला मोलाचा वाटत होता.

यातल्या बहुतांशी लोकांमध्ये आणि माझ्यामध्ये काहीही साम्य नसतांना मी जिंकावं असं त्यांना वाटलं याची कृतज्ञता वाटली. आणि हे आम्ही अवघ्या वर्षभरात साध्य केलं याचेही मला विशेष वाटले. अर्थात -- ७ ऑगस्टला खूप हलकंही वाटलं याबद्दल काही शंका नाही.

मनावरच्या ओझ्याप्रमाणेच खिशातले १० मिलियन डॉलरही नाहीसे झाल्यामुळे असेल कदाचित!
तर या सगळ्या उपद्व्यापातून मी काय शिकलो...? एक तर खाजगी उद्योगात CEO असतांना माझे राज्य असल्यासारखेच होते -- लोक अदबीने बोलणार, आणि शेवटी मी म्हणेन ते ऐकणार. सार्वजनिक क्षेत्रात पडल्यावर कुणीही तुम्हाला कितीही परखड प्रश्न विचारू शकतात आणि तुम्ही उत्तर द्यावं अशी त्यांची अपेक्षा असते. तुमचे विरोधक तेवढ्याच सहजपणे तुमच्यावर शिंतोडेही उडवू शकतात -- त्यात भले काही तथ्य असो व नसो, पण एकदा मतदारांच्या मनात शंका उत्पन्न झाली की त्यांचा उद्देश बऱ्याच प्रमाणात साध्य झाला असे म्हणायचे. राजकारणात अर्थातच तुमच्या वक्तृत्वकौशल्याला अनन्यसाधारण महत्व आहे -- निवडणूक जिंकणे ही बऱ्याच मोठ्या प्रमाणात ‘बोलण्याची’ किमया आहे. त्यावरून लोक तुम्हाला पडताळतात, तुम्ही विश्वासार्ह आहात की नाही हे ठरवतात. शेवटी माझी तयारी कमी पडली हे खरे -- माझ्या उमेदवारीने राज्यस्तरीय निवडणुकीत पकड घेण्यसाठी माझा resume अजून बराच बळकट करायची गरज होती असे वाटते.

गवर्नरपदाची लढत आटोपल्यानंतर मी तब्बल एक वर्ष सुट्टी घेतली -- एवढा प्रदीर्घ रिकामटेकडेपणा मी पहिल्यांदाच अनुभवला. पण अर्थात ७-८ महिन्यांनंतर मला काही नं करण्याचा पण कंटाळा येऊ लागला.
या दरम्यान बरेच ओळखीचे आणि अनोळखी लोक निवडणुकीनंतर माझ्या संपर्कात राहिले. काहीजणांनी मला आठवण करून दिली की Detroit शहरामध्ये मी इतर सर्व उमेदवारांना हरवले होते. बरेचजण सांगत होते, ‘build on the positives, don’t give up.’

सार्वजनिक सेवेचे माझे व्रत अर्धवट टाकणे मलाही पटणारे नव्हते, आणि या सगळयाचा परिणाम म्हणून मी पुन्हा परिस्थितीचा आढावा घेऊ लागलो -- मी अशी कुठली निवडणूक लढवू शकतो कि ज्यात जिंकण्याची शक्यता चांगली आहे?’ ‘माझी ओळख सर्वात जास्त कुठे आहे?’ -- या सगळ्या विश्लेषणानंतर State Representative-साठीचा लढा योग्य ठरेल अशा निष्कर्षाला मी पोचलो.

Detroit-च्या 3rd House District सीट-साठी लढा द्यायचा असे मी ठरवले आहे. ही निवडणूक देखील ‘open seat’ आहे, आणि ८ ते १० उमेदवार निवडणूक लढवतील असा अंदाज आहे. त्यातले ३-४ उमेदवार अनुभवी आहेत, तेंव्हा ही निवडणूक देखील चुरशीची होईल याबद्दल काही शंका नाही.

निवडणुकीच्या आचारसंहितेप्रमाणे उमेदवारांनी तिथे residency स्थापन करणे आवश्यक आहे -- म्हणून आम्ही आमचे Ann Arbor-चे लाडके 'designer' घर सोडून आता Detroit-मध्ये वास्तव्याला आलो आहोत. जागा नवीन असली तरी लोकांमध्ये उत्साह खूप आहे, आणि मागच्या निवडणुकीतली थोडीशी प्रेमाची शिदोरी देखील आहे. ही स्थानिक, लहानशी निवडणूक असली तरी जवळपास १ लाख मतदाते या भागात आहेत, पण फक्त १०-१५ हजार नागरिक मतदान करतात असा इथला अनुभव आहे.

या खेपेस जनसंपर्कावर जोर देण्याचा माझा मनसुबा आहे. अगदी दारो-दारी जाऊन लोकांशी बोलतो आहे, आणि मला ते खूप आवडतंय. One-on-One संवाद ही माझी जमेची बाजू आहे असे मला वाटते. वक्तृत्वाची इतर तयारी चालू आहेच. मागच्या खेपेप्रमाणे यावेळी देखील इतर उमेदवारांपेक्षा मोठी बाजी लावायचा निर्धारही आहेच. मराठी आणि भारतीय लोकांनी या निवडणुकीतही मला मदत करावी अशी माझी इच्छा आहे. तुम्हाला वेळ असल्यास आमचे campaign volunteer जरूर व्हा, शिवाय राजकारणात रस असलेल्या तुमच्या मुलांना आणि तुमच्या परिचयाच्या तरुण पिढीला माझ्या campaign मध्ये सहभागी व्हायला प्रोत्साहन द्या. यातून त्यांना मिशिगनची राजकीय प्रक्रिया अगदी जवळून पाहायला मिळेल, त्यात सहभागी होता येईल, आणि यातून कदाचित पुढच्या पिढीचे मोठे नेते देखील घडतील.

तर असा हा माझा राजकीय प्रवास मोठ्या समरभूमीवरून लहानग्या पण हेतुपूर्ण अशा टप्प्यावर आला आहे. इथल्या लोकांचं प्रेम आणि जिव्हाळा बघून वाटतं की बेळगाव जसे माझे लहानपणीचे गाव, तसेच पुढील आयुष्यासाठी Detroit हे माझे तेवढ्याच आपुलकीचे दुसरे घर आणि गाव होऊ शकते. तुम्ही याल तर तुम्हालाही तसेच वाटेल याची मला खात्री आहे!

**- श्री ठाणेदार**

---




With
Best Compliments
from

Pradeep
Kokate

## (न) झिजणाऱ्या चपला

कुठल्याही सरकारी कार्यालयात कामासाठी जाणं आपल्याला अगदी जिवावर येतं. याचं कारण आपल्याला खात्री असते, की तिकडे आजच्या दिवसात आपलं काम होणार नाहीये! म्हणजे 'एयरपोर्टवर गेल्यावर आपली फ्लाईट डिले झाली असणार', 'अंगणात खेळायला सोडलेलं बाळ सगळं सोडून माती खाणार' किंवा 'महेश कोठारेच्या सिनेमात त्याची जीप पंक्चर होऊन मग तो "डॅमिट" म्हणणार!', हे सगळं आपण जितक्या खात्रीने सांगू शकतो, अगदी तितक्याच खात्रीने आपल्याला माहिती असतं की सरकारी कार्यालयात आजच्या दिवसात काही आपलं काम व्हायचं नाही! काही लोक तर सरकारी कार्यालयाच्या एवढ्या खेपा मारतात, की त्यांच्या चपला झिजून, शेवटी खाली भोक पडून जेव्हा तापलेल्या रस्त्याचा तळपायाला चटका बसतो, तेव्हा त्यांच्या लक्षात येतं की आधीच शंभराची नोट सरकवायला हवी होती! कित्येक लोकांच्या चपला झिजतात, पण सरकारी कार्यालयाचा उंबरठा कधी झिजल्याचं ऐकिवात नाहीये. त्यामुळे रस्ते किंवा पूल बांधताना जरी कमी दर्जाचं मटेरिअल वापरलं जात असलं, तरी सरकारी कार्यालयाचे उंबरठे बनवताना भ्रष्टाचार किंवा हलगर्जीपणा कधीही होत नाही! तेव्हा यापुढे जेव्हा लोक मला तावातावाने विचारतील, "मला एक जागा सांग भारतात, की जिकडे भ्रष्टाचार होत नाही" तेव्हा "सरकारी कार्यालयाचा उंबरठा" असं उत्तर द्यायचं मी मनाशी पक्कं केलं आहे!

पण जगातलं सगळ्यात मोठं तत्वज्ञान जर तुम्हाला अनुभवायचं असेल, तर सरकारी कार्यालयासारखी दुसरी जागा शोधूनही सापडणार नाही! 'अपेक्षा ठेवली तरच दुःख वाट्याला येतं, नाहीतर जग हा सुखाचा महासागर आहे..'! याच विचाराचा प्रत्यय आपल्याला सरकारी कार्यालयात येत असतो! आपण काम असलं तरच सरकारी कार्यालयात जातो, आणि इथेच चुकतो! कधी काही काम, काही देणं-घेणं, काही अपेक्षा नसताना सरकारी कार्यालयात जाऊन बघा. तुम्हाला वेगळ्याच विश्वाचं दर्शन जर नाही झालं, तर तुम्हाला पुन्हा झिजवायला नवीन चपला मी घेऊन देईन!



खास फर्निचर्स बघायला सरकारी कार्यालयात जायचं. तिथली फर्निचर्स अगदी खास करवून घेतलेली असतात. म्हणजे बघा, तिथली जी डेस्क्स असतात, ती खूप उंच असतात आणि त्या पलिकडे जो माणूस बसलेला असतो, तो अगदीच खाली असतो. म्हणजे आपल्याला टाचा उंच करून त्याच्याकडे बघावं लागतं. आता असं का असतं, याबद्दल बरेच मतभेद आहेत. कोणी म्हणतं कामचुकारपणा बघून जर कोणाचं डोकं फिरलंच, तर हात सहजासहजी त्या पलीकडे बसलेल्या माणसाच्या गालापाशी पोहोचू नये, म्हणून असं खास बनवून घेतलेलं असतं! तर कोणी म्हणतं, की ते डेस्क जर कमी उंचीचं असेल तर त्यावर सामान्य माणसांना हात ठेवता येतील, आणि बराच वेळ समोरून उत्तरच आलं नाही, तर काहीतरी विरंगुळा म्हणून माणसं त्यावर तबला वाजवत बसतील, म्हणून ते उंचावर असतं!

पण मला सगळ्यात पटलेली थिअरी म्हणजे, प्रत्येक आलेल्या माणसाकडे चष्म्याच्या वरून बघून "काय कटकट आहे" असा खास "सरकारी" चेहेरा करण्यासाठी एवढा सगळा खटाटोप केलेला असतो! तिथल्या कपाटांना कधीही न लागणारी अशी वेगळी दारं केलेली असतात, जेणेकरून आतल्या रजिस्टरच्या गठ्ठ्यांकडे लोकांची नजर जावी आणि आपला कामसूपणा त्यांच्या डोळ्यात भरावा, यासाठी केलेली ती खास युक्ती असते. कपाटांवरही रजिस्टर्स ठेवायला जागा असते. त्या रजिस्टर्सची पानं गळायच्या तयारीत असतात. त्यावरच्या पुसटश्या रेघा वाळक्या पर्ण वाहिन्यांसारख्या दिसत असतात. तिथे नव्याने पालवी यायची जरासुद्धा शक्यता नसते...!

# स्नेहबंध

सरकारी कार्यालयात गेल्यावर पेशवे पार्कमध्ये गेल्यासारखं वाटू शकतं! आपण खूप उंचीवरून त्या खाली कॉम्प्युटरमध्ये डोळे घातलेल्या माणसाकडे बघत असतो. आपण त्याच्याशी बोलायचा प्रयत्न करत असतो. पण तो आपल्याकडे ढुंकूनही बघत नाही. तो ऐकून न ऐकल्यासारखा करतोय, का त्याला आपली भाषा समजत नाहीये, कळायला मार्ग नसतो.



तो खूप कामात असल्यासारखा वाटू शकतो, पण त्याच्या कॉम्प्युटरकडे वरून बघितल्यावर तो Pentium 1 असून, तो माणूस Windows 95 वर Solitair किंवा Minesweeper खेळत असल्यासारखा वाटतो. त्याचं लक्ष आपल्याकडे वळवून घ्यायला आपल्याला त्याला पॉपकॉर्न किंवा खारे दाणे टाकायची इच्छा होऊ शकते, पण तसं न केलेलंच बरं! काही वेळाने देवाच्या कृपेने आणि आपल्या नशिबाने तो आपल्याकडे बघतो. क्षणभर आपला आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत नाही. पण तो लगेच बसवावा लागतो, कारण तो आपल्याकडे क्षणभरच बघणार असतो! आपण त्याला आपला प्रश्न विचारतो आणि तो काही न बोलतो एक मळकट फॉर्म आपल्या हातात देतो. आपल्या प्रत्येक प्रश्नाला त्याच्याकडे एक मळकट फॉर्म असतो!

आपल्याकडे शाईचं पेन असेल तर ते पेन कागदावर टेकवताच शाई पसरायला सुरुवात होते. आपल्याकडे बॉलपेन असेल, तर लिहायला लागताच त्या कागदाला भोक पडतं! आपण केविलवाण्या नजरेने मग आजुबाजूला बघतो. प्रत्येकाची तशीच धडपड चालू असते. ते बघून जीवनातलं आपण "To err एकतरी प्रश्न निघतोच, की ज्याचा अर्थ तुम्हाला कळत नाही. माणसांना जमिनीवर आणण्याचं मोठं काम ते फॉर्म्स करत अis human" हे दुसरं मोठं तत्वज्ञान तेव्हा शिकतो! तुम्ही कितीही उच्चशिक्षित असाल, तरी त्या फॉर्मवर असा सतात. आपल्या मनात त्याच्याकडे जाऊन शंका विचारण्याचा विचार येतो, पण त्याचा त्रासिक चेहरा डोळ्यासमोर येऊन आपण अंदाजपंचेच त्याचं उत्तर लिहितो आणि फॉर्म पूर्ण करतो!

"उद्याच्याला या. साहेबांची सही घेऊन ठेवतो." पुन्हा रांगेत उभं राहून त्याला फॉर्म दिल्यावर त्याचं असं उत्तर येतं. "पण साहेब तर केबिनमधेच आहेत ना? आज नाही का होणार?" असं काहीतरी आपण विचारायचा प्रयत्न केला, की आपल्याला अपमानाची तयारी ठेवावी लागते! आपण अपेक्षा ठेवतो आणि म्हणूनच दु:ख आपल्या पदरात पडतं. "एकदा सांगितलं ना तुम्हाला, उद्या या! साहेब बिझी आहेत. तुमच्या सारखे शंभर फॉर्म आहेत या टेबलवर! साहेबांनी काय बाहेर येऊन सह्या करत बसायचं का?"! आपलं त्याने दाखवलेल्या त्या शंभर फॉर्म्सच्या गठ्ठ्याकडे लक्ष जातं. त्याला पांढऱ्या नाडीने बांधलेलं असतं. त्या माणसाच्या लेंग्याचं काय झालं असेल, असा विचार मनात येऊन आपण टाचा अजूनच उंच करून बघतो! पण त्याने लेंगा घातलेला नसतो. आपण उदास चेहऱ्याने त्या सरकारी कार्यालयाबाहेर पडतो.

दुसऱ्या दिवशी गर्दी टाळायला आपण भर सकाळी जातो. बहुतेक सगळ्यांनी आपल्यासारखाच विचार केलेला असतो. त्यामुळे ऑफिसला जायच्या आधी ते सरकारी कार्यालय भाजी-मंडई सारखं भरलेलं असतं. पुन्हा मोठ्या रांगेत थांबून, ऑफिसला थोडा उशीर करून आपला एकदाचा नंबर लागतो. आपल्या फॉर्मवर साहेबांनी वेळात वेळ काढून सही केलेली असते. "संध्याकाळच्याला या. शिक्का मारून मिळेल!" हे ऐकून आता आपलं डोकं बधीर व्हायची वेळ आलेली असते. 'अहो, तुमच्या शेजारी शिक्का आहे. त्याच्या शेजारी शाई आहे. तुम्हाला कितीसा वेळ लागणार आहे? तुम्हाला जमत नसेल तर मी स्वत: मारून घेतो!" असं चिडून म्हणायची मनात खूप इच्छा निर्माण होते. पण कालच झालेला अपमान ताजा असतो. त्यामुळे आपण शेळीसारखा चेहरा करून तिथून निघून जातो. बाहेर जाताना दारावर हसऱ्या गांधीजींचा फोटो लावलेला असतो. त्याच्या शेजारच्या भिंतीवर धीर-गंभीर लोकमान्य टिळकांचा फोटो असतो. सगळे आदर्श, सगळ्या आकांक्षा त्यावेळी गळून पडतात आणि रागारागाने आपण ऑफिसला निघून जातो.




ऑफिसमध्ये मग आपला चर्चेचा विषय असतो सरकारी कार्यालये, त्यातला ढिसाळ कारभार, भ्रष्टाचार, आपल्या इन्कमटॅक्सचा गैरवापर आणि देशाची अधोगती. मग आपल्या लक्षात येतं, आपल्या मित्राला एका दिवसात सही, शिक्का आणि रिसीट सगळंच मिळालं! तो आपल्याला मग आपण किती साधे आहोत यावर चिडवतो. दुसऱ्या दिवशी सख्ख्या मित्राच्या नात्याने आपल्या बरोबर त्या सरकारी कार्यालयात येतो. आपला नंबर आल्यावर समोरच्या माणसाला हळूच म्हणतो, "साहेब, संध्याकाळी चहाला थांबा ना..." पुढच्याच क्षणी आपल्या फॉर्मवर शिक्का बसलेला असतो आणि आपल्या हातात रिसीट असते!

संध्याकाळी आपण "चहाला" भेटतो. तो माणूस पहिल्यांदाच आपल्याला पूर्णपणे दिसतो. त्याने लेंगा घातलेला नसतो. तुमच्या आमच्या सारखा साधाच असतो तो दिसायला. आपण आपल्या खिशातली एक नोट काढून त्याला देतो. नोटेवरचे गांधीजी आपल्याकडे बघून हसत असतात. त्या क्षणी आपल्या चपलांचं झिजणं थांबतं आणि तो माणूस क्षणार्धात समोरच्या गर्दीत नाहीसा होतो....

**- सुशांत खोपकर**






## GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS



Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements


### Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

**Global Headquarters**
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com


Ganpati
Bappa
Moraya
स्नेहबंध